सत्यमेव जयते

# रोजगार हमी योजना समिती

## (२०२०-२०२१)

(चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

## पहिला अनुपालन अहवाल

(उस्मानाबाद जिल्ह्याच्या संबंधात)

**रोजगार हमी योजना समितीच्या चौथ्या अहवालात (सन २०१५-१६) समाविष्ट असलेल्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीवरील समितीचा पहिला अनुपालन अहवाल**

(सदर अहवाल दिनांक मार्च, २०२२ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई

२०२२

# रोजगार हमी योजना समिती

## (२०२०-२०२१)

(चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

## पहिला अनुपालन अहवाल

(उस्मानाबाद जिल्ह्याच्या संबंधात)

**रोजगार हमी योजना समितीच्या चौथ्या अहवालात (सन २०१५-१६) समाविष्ट असलेल्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीवरील समितीचा पहिला अनुपालन अहवाल**

एचबी २५४५—१

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
# रोजगार हमी योजना समिती
# (२०२०-२०२१)

**समिती प्रमुख**

(१) श्री. मनोहर चंद्रिकापुरे, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्री. अनिल बाबर, वि.स.स.
(३) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.
(४) श्री. उदयसिंग राजपुत, वि.स.स.
(५) श्री. महेंद्र थोरवे, वि.स.स.
(६) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.
(७) श्री. अतुल बेनके, वि.स.स.
(८) श्री. सुनिल भुसारा, वि.स.स.
(९) श्री. शिरीष चौधरी, वि.स.स.
(१०) श्री. ऋतुराज पाटील, वि.स.स.
(११) श्री. विक्रमसिंह सावंत, वि.स.स.
(१२) श्री. बबनराव यादव लोणीकर, वि.स.स.
(१३) श्री. दादाराव केचे, वि.स.स.
(१४) श्री. समीर मेघे, वि.स.स.
(१५) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.
(१६) श्री. समीर कुणावार, वि.स.स.
(१७) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
(१८) ॲड. आकाश फुंडकर, वि.स.स.
(१९) श्री. दिलीप बोरसे, वि.स.स.
(२०) श्री. राजेश पाटील, वि.स.स.
(२१) श्री. नरेंद्र दराडे, वि.प.स.
(२२) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.
(२३) श्री. राजेश राठोड, वि.प.स.
(२४) श्री. रामदास आंबटकर, वि.प.स.
(२५) श्री. गोपीचंद पडळकर, वि.प.स.
(२६) श्री.कपिल पाटील, वि.प.स. (विशेष निमंत्रित)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव,
(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव,
(३) श्री. रविंद्र जगदाळे, अवर सचिव,
(४) श्री. नितीन आहेर, कक्ष अधिकारी.

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
## रोजगार हमी योजना समिति
## (२०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.
(३) डॉ. संजय कुटे, वि.स.स.
(४) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
(५) श्री. समीर कुणावार, वि.स.स.
(६) श्री. रमेश बुंदिले, वि.स.स.
(७) श्री. संतोष दानवे, वि.स.स
(८) श्री. नारायण कुचे, वि.स.स.
(९) श्री. संजिवरेड्डी बोदकुरवार, वि.स.स.
(१०) डॉ. सुजित मिणचेकर, वि.स.स.
(११) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स.
(१२) श्री. योगेश घोलप, वि.स.स.
(१३) श्री. अनिल बाबर, वि.स.स.
(१४) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.
(१५) श्री. त्र्यंबक भिसे, वि.स.स.
(१६) श्री. अमर काळे, वि.स.स.
(१७) श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
(१८) डॉ. मधुसुदन केंद्रे, वि.स.स.
(१९) डॉ. सतिश पाटील, वि.स.स.
(२०) श्री. शरददादा सोनावणे, वि.स.स.
(२१) श्री. विनायक मेटे, वि.प.स.
(२२) श्री. विप्लव बाजोरीया, वि.प.स.
(२३) श्री. जयंत पाटील, वि.प.स.
(२४) श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स.
(२५) श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
(२६) श्री. बाळाराम पाटील. वि.प.स. (विशेष निमंत्रित)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार),
(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव,
(३) श्री. बाळकृष्ण माने, अवर सचिव (समिती),
(४) श्री. मोहन काकड, कक्ष अधिकारी.

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| १. | **प्रस्तावना :** .. .. | **(सात)** |
| २. | **कामाचे वार्षिक नियोजन** .. .. | **१** |
| ३. | **मजुरांच्या सोयीसवलतीवर करण्यात आलेला खर्च** .. .. | **३** |
| ४. | **मजुरांची नोंदणी** .. .. | **४** |
| ५. | **मजुरीचे वाटप** .. .. | **५** |
| ६. | **सामाजिक वनीकरण** .. .. | **१३** |
| ७. | **फलोत्पादन** .. .. | **१५** |
| ८. | **जवाहर विहिर कार्यक्रम** .. .. | **१७** |
| ९. | **परिशिष्ट - अ (विभागाची आश्वासित माहिती)** .. .. | **१९** |
| १०. | **परिशिष्ट - ब (बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त)** .. .. | **२५** |

## प्रस्तावना

मी, रोजगार हमी योजना समितीचा " समिती प्रमुख " या नात्याने समितीच्या अनुमतीने समितीच्या चौथ्या अहवालात (२०१५-१६) समाविष्ट असलेल्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीवरील समितीचा पहिला अनुपालन अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी महाराष्ट्र विधानमंडळाच्या उभय सभागृहास सादर केलेल्या उस्मानाबाद जिल्ह्यासंबंधातील चौथ्या अहवालातील (सन २०१५-२०१६) शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात नियोजन (रोहयो) विभागाकडून दिनांक २३ जानेवारी, ६ फेब्रुवारी, १४ जून २०१८, दिनांक २ जानेवारी २०१९ व १५ फेब्रुवारी २०२१ रोजी आणि महसूल व वन (महसूल) विभागाकडून दिनांक ६ फेब्रुवारी २०१८ रोजी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने विभागीय सचिव, नियोजन (रोहयो) विभाग, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. उस्मानाबाद, उपायुक्त विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद तसेच सहसचिव/उप सचिव, महसूल व वन विभाग (महसूल), अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंध विभाग यांची दिनांक २४ जानेवारी, ७ फेब्रुवारी, १५ मे, २० जून २०१८, दिनांक २ जानेवारी, २०१९ व १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी साक्ष घेण्यात आली.

बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट " **ब** " मध्ये देण्यात आले आहे. समितीसमोर असलेली कागदपत्रे व साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीवरुन हा अनुपालन अहवाल तयार करण्यात आलेला आहे.

मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी विभागीय सचिव, नियोजन (रोहयो) विभाग व अन्य प्रतिनिधी यांनी उपस्थित राहून आवश्यक ती माहिती देऊन सहकार्य केल्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने प्रारुप अहवाल दिनांक मार्च, २०२२ रोजीच्या बैठकीत विचारात घेतला व तो संमत करण्यात आला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २१ मार्च, २०२२.

**मनोहर चंद्रिकापुरे,**
समिती प्रमुख,
रोजगार हमी योजना समिती.

# अहवाल

रोजगार हमी योजना समितीचा उस्मानाबाद जिल्ह्यासंबंधातील चौथा अहवाल (२०१५-२०१६) दिनांक ६ एप्रिल २०१७ रोजी विधानमंडळ सभागृहास सादर करण्यात आला. सदरहू अहवालामध्ये रोजगार हमी योजनेच्या कामाचे वार्षिक नियोजन, मजुरांच्या सोयीसवलतीवर करण्यात आलेला खर्च, मजुरांची नोंदणी, मजुरीचे वाटप, सामाजिक वनीकरण, फलोत्पादन व जवाहर विहीर कार्यक्रम इ.बाबत अंतर्भूत असलेल्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात नियोजन (रोहयो) विभागाकडून दिनांक २३ जानेवारी, ६ फेब्रुवारी, १४ जून २०१८, दिनांक २ जानेवारी २०१९ व १५ फेब्रुवारी २०२१ रोजी तसेच महसूल व वन (महसूल) विभागाकडून दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ रोजी माहिती प्राप्त झाली व उक्त प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने विभागीय सचिव, नियोजन (रोहयो) विभाग, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. उस्मानाबाद व उपायुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद तसेच सहसचिव/उप सचिव, महसूल व वन विभाग (महसूल) तसेच अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांची दिनांक २४ जानेवारी, ७ फेब्रुवारी, १५ मे, २० जून २०१८, दिनांक २ जानेवारी, २०१९ व १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी उक्त अहवालाच्या संदर्भात साक्ष घेण्यात आली. समितीसमोर आलेली लेखी माहिती, शासन निर्णय, साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने व्यक्त केलेले अभिप्राय व शिफारशी यांचा अंतर्भूत या अहवालामध्ये करण्यात आले असून ते पुढील परिच्छेदात देण्यात आले आहेत.

**एक :- कामाचे वार्षिक नियोजन**

**(१)** सन २०११-१२ ते २०१४-१५ या कालावधीतील वार्षिक नियोजन आराखड्यात वार्षिक नियोजनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार जलसंवर्धनाची ५५ टक्के, पाटबंधाऱ्याची ५ टक्के, वनीकरण, सामाजिक वनीकरणाची १० टक्के, रस्ते व इतर ३० टक्के याप्रमाणे कामाचे वार्षिक नियोजन करणेबाबत समितीच्या सन २०१५-१६ च्या चौथ्या अहवालात केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने सन २०११-१२ ते २०१४-१५ या कालावधीतील वार्षिक नियोजन मार्गदर्शक तत्त्वानुसार झालेली नसल्याचे समितीला निदर्शनास आले. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने रस्त्यांचीच कामे करण्यात येऊन जलसंधारणाच्या कामांवर दुर्लक्ष करण्यात आल्याने त्याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. तरी, यापुढे जलसंधारणाच्या कामांची टक्केवारी जास्तीत जास्त वाढविण्याबाबत योग्य पद्धतीने नियोजन करण्यात यावे, अशी समितीने शिफारस केली होती.

उपरोक्त शिफारशींच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीत असे नमूद केले आहे की, महाराष्ट्र विधानमंडळ रोजगार हमी योजना समितीने केलेल्या शिफारशीनुसार सन २०१४-२०१५ ते माहे डिसेंबर, २०१७ अखेरपर्यंत वार्षिक नियोजन आराखडा मार्गदर्शक तत्त्वानुसार ५५% कामे ही जलसंधारण स्वरुपाची सुरू करण्याचे व त्यावर खर्च करण्याची दक्षता घेण्यात आली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**जलसंधारण कामावर झालेल्या खर्चाची वर्ष निहाय टक्केवारी**

| सन २०१४-२०१५ | सन २०१५-२०१६ | सन २०१६-२०१७ | सन २०१७-२०१८ (डिसेंबर २०१७ अखेर) |
|---|---|---|---|
| ४५.७२ | ५४.३२ | ६५.१४ | ६९.७६ |

रोजगार हमी योजना समितीने केलेल्या शिफारशीनुसार मोठ्या प्रमाणात जलसंधारणाची कामे आराखड्यात समाविष्ट करून कामाच्या खर्चात वाढ केली आहे. तसेच रस्त्याच्या कामावर सन २०१४-२०१५ मध्ये ४०.१९%, सन २०१५-२०१६ मध्ये ४१.१९%, सन २०१६-२०१७ मध्ये ०.८२% व सन २०१७-२०१८ मध्ये ८.२५% खर्च झाला आहे. मास्टर सर्क्युलर सन २०१७-१८ नुसार नैसर्गिक संसाधन संवर्धनाची (Natural Resource Management) कामे किमान ६०% घेण्याबाबत सर्व क्षेत्रीय यंत्रणांना सूचित केले आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यास योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार जलसंवर्धन, पाटबंधारे, सामाजिक वनीकरणाची वर्षनिहाय सुधारित माहिती देण्याच्या सूचना व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे (V.C) देण्यात आल्या आहेत.

(२) शेततळ्यांची कामे रोजगार हमी योजनेमधून केली जातात. मनरेगा व राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत झालेल्या शेततळ्यांच्या अस्तरीकरणासाठी शासनाकडून ५० टक्के अनुदान दिले जाते व ५० टक्के रक्कम शेतकऱ्याला भरावी लागते असे विभागाच्या सचिवांनी समितीला सांगितले असता त्यावर समितीने सूचना केली की, शेततळ्यासाठी शासनाकडून लाभार्थ्यांना देण्यात येणारी अनुदानाची रक्कम ५० टक्क्यांवरुन ७५ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात यावी. तसेच ज्या भागामध्ये मोठ्या प्रमाणावर उष्णता आहे, त्या भागात शेतकरी शेततळी बांधतात, पाणी अडवतात

आणि त्याचा वापर करतात. परंतु शेततळ्याचे अस्तरीकरण न झाल्यामुळे पाण्याचे मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होते व त्याचा लाभ शेतकऱ्यांना होत नाही. यास्तव शेततळ्याचे काम पूर्ण झाल्यावर शेततळ्याच्या अस्तरीकरणासाठी तातडीने प्लॅस्टिक कागद उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन (रोहयो) व कृषि विभाग यांनी समन्वय साधून कार्यवाही करावी, अशी शिफारस समितीने केली होती.

उपरोक्त शिफारशींच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीत असे नमूद केले आहे की, सद्यःस्थितीत राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत ५०% अनुदानावर शेततळे अस्तरीकरण योजना राबविली जात आहे. वर्षनिहाय विविध योजनेमध्ये झालेले शेततळे व अस्तरीकरण खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | योजना | | एकूण | एकूण पैकी अस्तरीकरण झालेली शेततळे |
|---|---|---|---|---|---|
| | | मागेल त्याला शेततळे | मग्रारोहयो | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | २०१५-१६ | - | १०० | १०० | १४ |
| २ | २०१६-१७ | ४६३ | ७१ | ५३४ | ७२ |
| ३ | २०१७-१८ | १२०५ | - | १२०५ | ०४ |
| | **एकुण** | **१६६८** | **१७१** | **१८३९** | **९०** |

कृषि विभागामार्फत सन २०१६-२०१७ मध्ये १०० शेततळ्यांसाठी रु.७५.०० लक्ष रक्कम शासनाने जिल्ह्यासाठी प्रस्तावित केली होती. त्यापैकी ६७ शेततळ्यांसाठी रुपये ४०.८० लक्ष खर्च झालेली आहे. सन २०१७-२०१८ मध्ये रु.११७.३५ लक्ष रकमेची अस्तरीकरणासाठी तरतूद करण्यात आली असून त्यासाठी लाभार्थ्यांचे १५७ अर्ज प्राप्त झाले आहेत. सर्व लाभार्थ्यांना अस्तरीकरणासाठी पूर्वसंमती देण्यात आल्या आहेत. अस्तरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

शेततळ्यांसाठी अस्तरीकरण करण्यासाठी ५०% अनुदानाऐवजी ७५% अनुदान करणे बाबत संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ, शिवाजी नगर, पुणे-५, यांना दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ अन्वये कळविले आहे. शेततळ्यांसाठी अस्तरीकरण करण्याची बाब मनरेगाच्या अनुज्ञेय कामामध्ये समावेश करण्याबाबतची विनंती केंद्र सरकारला केली आहे.

अहवालातील उपरोक्त शिफारशीवर शासनाने केलेल्या कार्यवाही संदर्भात दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी घेण्यात आलेल्या साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सन २०११-१२ ते सन २०१४-१५ या कालावधीत वार्षिक नियोजन मार्गदर्शक तत्त्वानुसार झालेले नव्हते. सन २०१५-१६ व सन २०१६-२०१७ या कालावधीत करण्यात आलेले वार्षिक नियोजन मार्गदर्शक तत्त्वानुसार करण्यात आले काय, तसेच जलसंधारणाच्या कामांची टक्केवारी वाढविण्यासंदर्भात कशाप्रकारे नियोजन करण्यात आले, शेततळ्यासाठी शासनाकडून लाभार्थ्यांना देण्यात येणारी अनुदानाची रक्कम ५० टक्क्यांवरुन ७५ टक्क्यांपर्यंत वाढविण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला का ? नसल्यास, त्याची कारणे काय आहेत, तसेच शेततळ्याचे काम पूर्ण झाल्यावर शेततळ्याच्या अस्तरीकरणासाठी प्लॅस्टिक कागद उपलब्ध करून देण्यासाठी कृषि विभागाशी समन्वय साधून काय कार्यवाही करण्यात आली, त्या संदर्भात सचिव, नियोजन (रोहयो) विभाग यांनी सांगितले की, सन २०११-१२ मध्ये आराखड्यानुसार ५५ टक्के जलसंधारणाची कामे केली नव्हती. पण आता सन २०१७-२०१८ मधील परिस्थिती अशी आहे की, जलसंधारण कामावर झालेल्या खर्चाची टक्केवारी पाहिली तर सन २०१४-१५ मध्ये ४५ टक्के, सन २०१५-१६ मध्ये ५४ टक्के, सन २०१६-१७ मध्ये ६५ टक्के आणि सन २०१७-१८ मध्ये ७० टक्के कामे पूर्ण झालेली आहेत. तसेच सन २०१७-१८ मधील केंद्र सरकारच्या ज्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आहे, त्यानुसार किमान ६० टक्के काम जलसंधारणाचे बंधनकारक केलेले असून ती कामे प्रगती पथावर आहेत.

शेततळ्याबाबतच्या मुद्यावरील समितीच्या प्रश्नाला सचिव, नियोजन (रोहयो) विभाग यांच्याकडून उत्तर प्राप्त झाले नाही. त्याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली.

**अभिप्राय व शिफारशी :**

(१) वार्षिक नियोजन आराखड्यात वार्षिक नियोजनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार जलसंवर्धनाची ५५ टक्के, पाटबंधाऱ्याची ५ टक्के, सामाजिक वनीकरणाची १० टक्के, रस्ते व इतर यासाठी ३० टक्के याप्रमाणे कामाचे वार्षिक नियोजन करून यापुढे जलसंधारणाच्या कामांची टक्केवारी जास्तीत जास्त वाढविण्यात यावी अशी शिफारस सन २०१५-२०१६ च्या अहवालात करण्यात आली होती त्यानुषंगाने वार्षिक नियोजनाची आवश्यकता असताना मागील ५ वर्षाच्या कालावधीत त्याप्रमाणे कामे झालेली नसल्याचे समितीला निदर्शनास आले व त्याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली. **समितीच्या साक्षीच्या वेळी यापुढे जलसंधारणाची कामे जास्तीत जास्त वाढविण्यात येतील याबाबत सचिवांनी दिलेल्या आश्वासनानुसार तसेच केंद्र शासनाच्या परिपत्रकानुसार जलसंधारणाची कामे ६० टक्के करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला तीन महिन्यांत अवगत करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

(२) शेततळ्याचे अस्तरीकरण करण्यासाठी शासनाकडून लाभार्थ्यांना देण्यात येणारी अनुदानाची रक्कम ५० टक्क्यांवरुन ७५ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात यावी व शेतकऱ्यांना शेततळ्याचे काम पूर्ण केल्यावर शेततळ्याच्या अस्तरीकरणासाठी तातडीने प्लॅस्टिक कागद उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन (रोहयो) व कृषि विभाग यांनी समन्वय साधून कार्यवाही करावी अशा प्रकारे समितीने सन २०१५-१६ च्या चौथ्या अहवाल केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने नियोजन (रोहयो) विभागाकडून संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ, शिवाजीनगर, पुणे-५ यांना दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ रोजी कळविण्यात आले आहे. तथापि, शेततळ्यासाठी अद्यापपर्यंत अनुदानाची रक्कम वाढविण्यात आली नसल्याचे समितीला निदर्शनास आले आहे. तरी, **शेततळ्याच्या अस्तरीकरणासाठी अनुदानाची रक्कम ७५ टक्क्यापर्यंत वाढविण्यात येण्यासंदर्भात कृषि विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात यावा तसेच शेततळ्यांसाठी अस्तरीकरण करण्याची बाब नरेगाच्या अनुज्ञेय कामामध्ये समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव मार्गी लागण्यासाठी शर्थीने प्रयत्न करावेत व केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला तीन महिन्यांत अवगत करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

**(दोन) : मजुरांच्या सोयी सवलतीवर करण्यात आलेला खर्च :-**

उस्मानाबाद जिल्ह्यात मजुरांच्या सोयी सवलतीवर कमी खर्च झालेला आहे. शासन निर्णयानुसार मजुरांच्या सोयीसवलतीवर ३ टक्के रक्कम खर्च करणे आवश्यक आहे. मजुरांच्या सोयीसवलतीसाठी सन २०११-१२ मध्ये एकूण खर्चाच्या १.७०, सन २०१२-२०१३ मध्ये १.२६, सन २०१३-२०१४ मध्ये ०.९२, सन २०१४-२०१५ मध्ये १.६१ एवढा खर्च करण्यात आला आहे. ही बाब निश्चितच योग्य नाही.

मजुरांना झाडाखाली जेवणासाठी बसण्याची व्यवस्था करणे आणि कामांच्या ठिकाणी झाड नसेल तर शेड उभारणे, मजुरांच्या लहान मुलांसाठी पाळणा घरांची व्यवस्था करणे, पिण्यासाठी निर्जतुक पाणी व तात्काळ वैद्यकीय मदत पुरविणे इत्यादी सोयी सवलती मजुरांना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. मजुरांना जास्तीत जास्त सोयी सवलती दिल्या तर मजुरांच्या उपस्थितीत निश्चितच वाढ होते. तरी, यापुढे रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांवर शासन निर्णयानुसार ३ टक्के रक्कम खर्च करण्यात यावी, अशी समितीने शिफारस केली होती.

उपरोक्त शिफारशींच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीत असे नमूद केले आहे की, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत जिल्ह्यात मजुरांना कामाच्या ठिकाणी दुपारच्या वेळी बसण्यासाठी, जेवणासाठी शेडची उभारणी करणे, मजुरांच्या लहान मुलांसाठी पाळणा घराची व्यवस्था करणे, पिण्याचे निर्जतूक पाणी पुरविणे, वैद्यकीय मदत इत्यादी सोयी सुविधा पुरविणे आवश्यक आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात या सोयी सवलतीसाठी शासन निर्णयानुसार तीन टक्के खर्च करणे आवश्यक होते. जिल्हा बैठकीसाठी तयार करण्यात आलेल्या पुस्तिकेत सन २०११ ते २०१५ या कालावधीत मजुरांच्या सुखसोयीवर सरासरी वार्षिक खर्च १.३७% झाला आहे. वर्ष निहाय खर्च तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | सुख सोयीवर झालेला खर्च | |
|---|---|---|---|
| | | रक्कम | टक्केवारी |
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | २०११-२०१२ | ८०.४१ लक्ष | १.७० |
| २ | २०१२-२०१३ | १३२.४३ लक्ष | १.२६ |
| ३ | २०१३-२०१४ | ५६.९६ लक्ष | ०.९२ |
| | सरासरी एकूण | | १.३७% |

| अ.क्र. | वर्ष | सुख सोयीवर झालेला खर्च | |
|---|---|---|---|
| | | रक्कम | टक्केवारी |
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | २०१४-२०१५ | ७१.५९ लक्ष | १.६१ |
| २ | २०१५-२०१६ | ८६.५५ लक्ष | १.३२ |
| ३ | २०१६-२०१७ | ५४.४३ लक्ष | १.३२ |
| ४ | २०१७-२०१८ (डिसें. २०१७ पर्यंत) | ३६.८९ लक्ष | २.०४ |

यापुढे मजुरांना सर्व प्रकारच्या सोयी सवलती पुरविण्याची दक्षता घेण्यात येत आहे. शासनाकडून व्हिडीओ कॉन्फरन्स (V.C) द्वारे सुधारीत माहिती देण्याबाबत तसेच मजुरांच्या सोयी सुविधांवर ३ टक्के खर्च करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाही संदर्भात दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी घेण्यात आलेल्या साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, मजुरांच्या सोयी सवलतीवर शासन निर्णयानुसार ३ टक्के रक्कम खर्च करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ या कालावधीत मजुरांच्या सोयी सवलतीवर किती रक्कम खर्च करण्यात आली व त्यांना कोणकोणत्या सोयीसुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत, त्यांसदर्भात सचिव, नियोजन (रोहयो) विभाग यांनी विदित केले की, मजुरांच्या सोयी सवलतीवर सन २०१४-१५ मध्ये १.६१ टक्के, सन २०१५-२०१६ मध्ये १.३२ टक्के, सन २०१६-२०१७ मध्ये १.३४ आणि सन २०१७-२०१८ मध्ये २.४ टक्के असा खर्च करण्यात आलेला आहे. सद्यःस्थितीत मजुरावरील कमाल खर्च ३ टक्के आहे. काही ठिकाणी मजुराची संख्या कमी असल्यामुळे त्यांना सर्व सुविधा देऊ शकत नाही. काही ठिकाणी जास्त मजुर असतील तर त्यांना आवश्यक सुविधा पुरविल्या जात आहेत. त्यावर समितीने सूचना केली की, मजुराची संख्या जास्त असेल तर सुविधा उपलब्ध करून द्यावयाच्या आणि मजुरांची संख्या कमी असेल तर सुविधा करणे शक्य होणार नाही, असे म्हणून चालणार नाही. मजुरांना कमी जास्त प्रमाणावर का होईना त्यांना सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. यासंदर्भात सचिवांनी स्पष्ट केले की, पूर्वी एका ठिकाणी २५ मजुर असतील तर त्यांना पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी एक स्वतंत्र व्यक्ती उपलब्ध करून दिला जात होता. पण आता मजुर कमी असल्यामुळे सदरहू ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था त्याच मजुरांना करावी लागत आहे. संबंधित मजुरांना अशा प्रकारच्या लहान मोठ्या सुविधा देण्याची आवश्यकता आहे व यात सुधारणा होणे गरजेचे आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

मजुरांच्या सोयी सवलतीवर शासन निर्णयाप्रमाणे ३ टक्के रक्कम खर्च करण्यात यावी अशी शिफारस समितीने सन २०१५-१६ च्या चौथ्या अहवालात केली होती त्यानुषंगाने मजुरांच्या सोयी सवलतीवर ३ टक्के रक्कम खर्च करणे आवश्यक असतानाही उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये मजुरांच्या सोयी सवलतीवर कमी खर्च करण्यात येत असल्याचे समितीला निदर्शनास आले. समितीने अहवालात केलेल्या शिफारशीनुसार त्यामध्ये वाढ होणे अपेक्षित होते. तथापि, मजुरांच्या सोयीसवलतीवर ३ टक्के पेक्षा कमी रक्कम खर्च करण्यात आली. त्यासंदर्भात सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीला सांगण्यात आले की, जेथे मजुरांची संख्या जास्त आहे, त्याठिकाणी मजुरांच्या सोयी सवलतीसाठी आवश्यक सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत व ज्या ठिकाणी मजुरांची संख्या कमी प्रमाणात होती तेथे मजुरांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या नाहीत. याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. **यापुढे कामांच्या ठिकाणी मजुरांची संख्या जरी कमी असली तरी मजुरांच्या सोयीसवलतीवर शासन निर्णयाप्रमाणे ३ टक्के रक्कम खर्च करण्यात यावी तसेच मजुरांना जेवणासाठी शेड उभारणे, त्यांच्या मुलांसाठी पाळणाघर, पिण्यासाठी निर्जंतूक पिण्याचे पाणी, तात्काळ वैद्यकीय मदत या सारख्या सोयीसवलती उपलब्ध करून देताना त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्यात व याबाबतचा अहवाल समितीला तीन महिन्यांत सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

**(तीन) मजुरांची नोंदणी :-**

उस्मानाबाद जिल्ह्यात ५,४४,३०० इतक्या मजुरांची नोंदणी करण्यात आली असून त्यामध्ये नोंदणीकृत कुटुंबांची संख्या २,१४,९०५ इतकी आहे व त्यापैकी २,९१,०४४ इतक्या व्यक्तींना जॉब कार्डचे वाटप करण्यात आलेले आहे. सध्या कार्यरत मजुरांची संख्या १.१३ लाख इतकी आहे. पंतप्रधान जनधन योजनेच्या माध्यमातून जवळपास ३.५८ लाख मजुरांची खाती ही पोस्टात उघडण्यात आल्यामुळे त्या कुटूंबातील व्यक्तींना फार त्रास होतो. यास्तव, यापुढे पंतप्रधान जनधन योजनेतंर्गत मजुरांचे खाते हे जवळच्या राष्ट्रीयकृत बँकेतच उघडण्यात यावे व मजुरांना सर्व सेवा बायोमॅट्रिक पद्धतीने देण्यात याव्यात, अशी शिफारस समितीने केली होती.

उपरोक्त शिफारशींच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीत असे नमूद केले आहे की, उस्मानाबाद जिल्ह्यात नोंदणीकृत मजुरांची संख्या ५,३८,८८९/- असून नोंदणीकृत संख्या २,१७,७४४ आहे. त्यापैकी २,००,७७९ कुटूंबांना जॉबकार्डचे वाटप करण्यात आले आहे. सध्या कार्यरत मजुरांची संख्या १,१२,७५१ आहे. मजुरांची मजुरी वेळेवर वाटप व्हावी म्हणून ७०,००९ मजुरांनी बँकेत खाते उघडले असून दि. १६ जानेवारी, २०१८ रोजीच्या संकेतस्थळावरील अहवालानुसार पोस्टात ३९,५९२ मजुरांची खाती आहेत. पोस्टातील ही खाती कमी करून बँकेत खाते उघडण्यासाठी मजुरांना प्रवृत्त करण्यात येत आहे.

पोस्टात मजुरांची असलेली खाती बँकेत उघडण्याबाबत उस्मानाबाद जिल्ह्यास सूचना दिल्या आहेत. त्याचप्रमाणे मजुरांना सर्व सेवा देण्याबाबतही व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे (V.C.) सूचना देण्यात आल्या आहेत तसेच आधार संलग्न सेवेमार्फत मंजुरांची मजुरी देण्याबाबत राज्यामध्ये कार्यवाही करण्यात येत आहे.

अहवालातील शिफारशीवर शासनाने केलेल्या कार्यवाही संदर्भात दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी घेण्यात आलेल्या साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, जिल्ह्यातील मजुरांचे खाते कोणकोणत्या राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्यात आलेले आहे. राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडण्यासंदर्भात व सर्व सेवा बायोमेट्रीक पद्धतीने देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली त्यांसंदर्भात सचिव, नियोजन (रोहयो) विभाग यांनी माहिती दिली की, उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये नोंदणीकृत मजुरांची संख्या ५ लाख ३८ हजार आहे. त्यापैकी २ लाख १७ हजार कुटूंब खरे आहेत. यामधील कार्यरत

मजुरांची संख्या १ लाख १२ हजार आहे. त्यावेळी अनेक लोकांनी जॉब कार्ड काढले होते. त्यावेळी जवळपास ८५ लाख जॉब कार्ड देण्यात आले होते. प्रत्यक्ष कामावर येणाऱ्या मजुरांची संख्या खूप कमी आहे. उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये अशा प्रकारच्या मजुरांची संख्या ही १ लाख १२ हजार आहे, या जिल्ह्यामध्ये पोस्ट ऑफीसमध्ये खाती असलेल्या मजुरांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होत आहे. ती संख्या कमी करण्यासंदर्भात शासन स्तरावरून सूचना दिलेल्या आहेत. सद्यःस्थितीत पोस्ट ऑफिसमध्ये ३९ हजार ५९२ मजुरांचे खाते आहेत. सदर खाते कमी करण्यासंदर्भात विभागाने एक मोहीम आखली आहे. आता मजुरांची एकूण ३९ हजार ४५८ इतकी खाती आहेत. सदर खाते टप्प्याटप्प्याने कमी करण्यात येतील. तसेच सदर खाते बंद करून मजुरांच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये नवीन खाते उघडण्यात येणार आहेत. हे सर्व खाते आधारशी लिंक केलेले आहेत. त्यामुळे आता कोणतीही अडचण भासणार नाही.

**अभिप्राय व शिफारशी :**

उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये यापुढे पंतप्रधान जनधन योजने अंतर्गत मजुरांचे खाते हे जवळच्या राष्ट्रीयकृत बँकेतच उघडण्यात यावे व मजुरांची सेवा बायोमॅट्रीक पद्धतीने देण्याबाबतची शिफारस समितीच्या सन २०१५-१६ च्या चौथ्या अहवालात करण्यात आली होती त्यानुषंगाने जिल्ह्यांत नोंदणीकृत मजुरांची संख्या ५ लाख ३८ हजार इतकी असून त्यापैकी कार्यरत मजुरांची संख्या १ लाख १२ हजार इतकी आहे. सद्यःस्थितीत त्यापैकी ३९ हजार ५९२ मजुरांचे खाते पोस्टामध्ये आहे. सदर पोस्टातील खाते टप्प्याटप्प्याने कमी करण्यात येऊन राष्ट्रीयकृत बँकेमध्ये नवीन खाते उघडण्यात येणार आहेत, असे नियोजन विभागाच्या सचिवांनी साक्षीच्या वेळी समितीला सांगितले. **मजुरांची मजुरी विहित वेळेत वाटप होण्यासाठी मजुरांचे खाते राष्ट्रीयकृत बँकेत असणे व सदरहू खाते आधार कार्डशी जोडणे आवश्यक आहे. त्यामुळे मजुरांना सर्व सेवा बायोमेट्रीक पद्धतीने देता येतील. तरी यापुढे शासनाने जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत मजुरांची खाते जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्यात येऊन ते खाते आधार कार्डशी जोडण्याबाबत मजुरांना प्रवृत्त करण्यात यावे, जेणेकरून मजुरांना सर्व सेवा बायोमेट्रीक पद्धतीने उपलब्ध होतील त्यानुसार याबाबत केलेल्या कार्यावाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**(चार) मजुरीचे वाटप :-**

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा तालुक्याच्या तत्कालीन तहसीलदार यांच्या कार्यकाळात कामे अपूर्ण अवस्थेत असणे, त्यासंदर्भात स्थानिक लोकांकडून तक्रारी येणे, रोहयोच्या कुशल कामांचे पैसे परस्पर ठेकेदारास वाटप करणे, कॅशबुकमध्ये खाडाखोड करणे, हजेरीपटात नावे बदलणे व एका तालुक्याच्या हजेरीपटाची दुय्यम प्रत (Duplicate) करून दुसऱ्या तालुक्यात वापरणे, इत्यादी बाबी समितीने साक्षीच्या वेळी निदर्शनास आणल्या असता जिल्हाधिकारी यांनी परांडा तालुक्याच्या तत्कालीन तहसीलदार यांच्या उपरोक्त आरोपासंदर्भात सहमती दर्शवली व चौकशीचे आदेश देण्यात आलेले आहेत, असे सांगितले.

उपरोक्त प्रकरणी परांडा तालुक्याच्या तत्कालीन तहसीलदार यांच्याविरुद्ध सुरू असलेली विभागीय चौकशी विहित कालावधीत पूर्ण करणे अपेक्षित होते. तथापि, अद्यापपर्यंत त्यांची विभागीय चौकशी पूर्ण करण्यात आली नसल्याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. तरी, या प्रकरणी परांडा तालुक्याच्या तत्कालीन तहसीलदार यांच्यासंदर्भात विभागीय चौकशी लवकरात लवकर पूर्ण करून त्यांच्यावर कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी जेणेकरून त्यांना पुनःस्थापित करण्याचा प्रश्न उद्भवणार नाही. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल एक महिन्याच्या आत समितीला सादर करण्यात यावा, अशी समितीने शिफारस केली होती.

उपरोक्त शिफारशीवर करण्यात आलेल्या कार्यवाही संदर्भात नियोजन (रोहयो) व महसूल व वन (महसूल) या विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीच्या दिनांक २४ जानेवारी, ७ फेब्रुवारी, १५ मे, २० जून, २०१८, २ जानेवारी, २०१९ व दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या बैठकांमध्ये सचिव नियोजन (रोहयो) विभाग, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. उस्मानाबाद, उपायुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद तसेच सह सचिव, महसूल व वन विभाग (महसूल) अपर पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

परांडा तालुक्याच्या तत्कालीन तहसीलदार यांनी कॅशबुकमध्ये खाडाखोड, हजेरीपटातील नावे बदलणे इत्यादीसारख्या गंभीर बाबी समितीच्या निदर्शनास आलेल्या होत्या. सदरहू प्रकरणी त्यांची विभागीय चौकशी करून त्यांच्यावर कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे काय, असे समितीने विचारणा केली असता त्यासंदर्भात सह सचिव, महसूल विभाग यांनी सांगितले की, श्रीमती वैशाली पाटील, तत्कालीन तहसीलदार यांच्या संदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची चौकशी सुरू असून महसूल विभागाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून यासंबंधीचा प्रगती अहवाल मागविलेला आहे. तो अहवाल गोपनीय स्वरूपाचा असल्यामुळे बंद लखोट्यात समितीकडे सादर केला आहे. त्यावर सचिव, नियोजन (रोहयो) यांनी अधिक माहिती दिली की, त्यांची विभागीय चौकशी पूर्ण झाली आहे. सध्या त्या हिंगोली येथे तहसीलदार पदावर कार्यरत आहे. त्यांना अकार्यकारी पदावर पदभार देण्याकरिता औरंगाबादच्या उपायुक्तांनी मा. महसूल मंत्री यांच्याकडे नस्ती सादर केली आहे.

श्रीमती वैशाली पाटील यांचा गोपनीय अहवाल जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर केलेला आहे. सदर अहवालामध्ये जिल्हाधिकारी यांनी श्रीमती वैशाली पाटील यांच्यावर ताशेरे मारलेले आहेत. त्यानंतर श्रीमती वैशाली पाटील यांना निलंबित करण्यात आले आहे का, अशी समितीने पृच्छा केली असता सचिव, नियोजन (रोहयो) यांनी श्रीमती वैशाली पाटील या निलंबित झालेल्या होत्या. त्यानंतर

६ महिन्यानंतर त्यांना परत अकार्यकारी पदावर प्रस्तावित केलेले आहे. यासंदर्भात समितीच्या बैठकीत निर्णय झाल्यानुसार त्यांना अकार्यकारी पदावर नियुक्त करण्यात आलेले आहे. त्यावर समितीने निर्देश दिले की, जो गोपनीय अहवाल सादर केलेला आहे. त्यावर योग्य कार्यवाही करून त्यासंदर्भातील माहिती समितीला सादर करण्यात यावी.

उस्मानाबाद येथील प्रकरणात संबधित अधिकारी निलंबित झालेले असून त्यांना पुन्हा पुनःस्थापित करण्यात येणार नाही. याबाबत काय उपाययोजना करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात सचिव, नियोजन (रोहयो) विभाग यांनी सांगितले की, उस्मानाबाद येथील प्रकरणात श्रीमती पाटील, तत्कालीन तहसीलदार, परांडा/कळंब यांची विभागीय चौकशी झाली असून त्यासंदर्भातील अहवाल समितीसमोर ठेवण्यात येईल. श्रीमती पाटील यांनी ३ कोटी २५ लाख रुपयाचे धनादेश आपल्या अधिकारात लिहिलेले आहेत. सदरहू धनादेश त्यांनी चुकीने लिहिलेले नसल्याचे दिसून येते. यावर समितीने निदर्शनास आणले की, तेथे कामे झालेली नसतानादेखील त्यांनी स्वतः कंत्राटदाराला धनादेश देणे व दुसऱ्या तालुक्यातील मस्टर स्वतः छापून पैसे काढलेले आहेत. याबाबत नियोजन (रोहयो) विभागाच्या सचिवांनी प्रतिपादन केले की, श्रीमती पाटील पदावर रुजू होण्यापूर्वी जमाखर्चाच्या नोंदीवर स्वाक्षरी करणे, धनादेश कार्यान्वयित यंत्रणेऐवजी गुत्तेदाराच्या नावे करणे, रोख पुस्तिकेतील क्रमांकानुसार धनादेश नसणे, जी रक्कम नमूद आहे त्यापेक्षा अधिक रकमेचे धनादेश देणे, रोख पुस्तिकेत नमूद असलेल्या रक्कमेपैकी कमी धनादेश देणे, धनादेश रद्द केल्यानंतर त्याची कारणे दिलेली नसणे, बँक स्टेटमेंटनुसार आहरित न झालेले धनादेश रोख पुस्तिकेत खर्च बाजूस न नोंदविणे, रोख पुस्तिकेत पदभार घेतल्याबाबत कोणत्याही नोंदी नसणे, असे आरोप त्यांच्यावर बजाविण्यात आलेले आहेत.

त्या अधिकाऱ्यांनी दुसऱ्या तालुक्यातील हजेरीपट छापून घेणे, जास्तीचे धनादेश देण्यात येणे, अनेक महिने स्वतःकडे धनादेश ठेवून घेणे, अतिरिक्त धनादेश देणे, कार्यकाळ संपल्यानंतर कॅशबुक भरणे, एका तालुक्याची हजेरीपट दुय्यम करून ती दुसऱ्या तालुक्यात वापरणे याबाबत त्यांच्यावर दोषारोप का नोंदविलेला नाही, असे समितीने विचारले असता यासंदर्भात सचिवांनी विदित केले की, सदर प्रकरणी योग्य ती कारवाई करण्यात येऊन त्याबाबत समितीला माहिती देण्यात येईल.

उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा तालुक्याच्या तत्कालीन तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांची सहा महिन्याच्या आत विभागीय चौकशी होणे आवश्यक होते. तथापि, त्यांच्या विभागीय चौकशीचा कालावधी वाढल्यामुळे त्यांना पुनःस्थापित करण्यात आलेले आहे. त्यांनी केलेल्या गैरव्यवहार व अनियमिततेबाबत त्यांची सेवा समाप्त होणे अपेक्षित होते. यामुळे रोहयो योजनेसंदर्भात लोकांमध्ये चांगला संदेश आणि लोकांच्या मनामध्ये विश्वास निर्माण झाला असता अशी समितीने भावना व्यक्त केली. तसेच जिल्ह्यातील संबधित बेजबाबदार व गैरप्रकार करणाऱ्या अधिकाऱ्यामुळे रोजगार हमीचे कामे होत नाहीत, त्यामुळे समितीने नाराजी व्यक्त केली. तरी, याप्रकरणी संबधित व्यक्तीविरुद्ध करण्यात आलेल्या कारवाईबाबत समितीला माहिती द्यावी, असे समितीने निर्देश दिले असता सचिव, नियोजन (रोहयो) विभाग यांनी समितीला विदित केले की, उस्मानाबाद येथे समितीचा दौरा झाल्यानंतर तेथे त्यावेळेस काही गंभीर बाबी समितीच्या निदर्शनास आल्या होत्या. तेथील तत्कालीन तहसीलदार यांच्याविरुद्ध कळंब येथील केलेल्या कामामुळे आणि परांडा येथेदेखील केलेल्या अनियमिततेमुळे दोन वेगवेगळ्या विभागीय चौकश्या सुरू होत्या. कळंबच्या प्रकरणामध्ये त्यांना निलंबित करण्यात आलेले होते. मध्यंतरीच्या काळामध्ये पुन्हा त्यांना सेवेत घेण्यात आले होते. त्याची चौकशी आता पूर्ण झालेली आहे. या प्रकरणामध्ये विभागीय आयुक्त, औरंगाबाद जी काही शिक्षा प्रस्तावित करतील त्यानुसार माननीय मंत्रिमहोदयांच्या मान्यतेने योग्य तो निर्णय घेण्यात येईल. दुसऱ्या प्रकरणामध्ये ३ कोटी ८३ लाख रुपये त्यांनी सेल्फने काढलेले होते आणि ते पैसे त्यांनी एजन्सीला दिलेले होते. त्याबाबतची चौकशीदेखील अंतिम टप्प्यांमध्ये आहे.

उपरोक्त प्रकरणी उपायुक्त (रोहयो) यांनी सांगितले की, विभागीय चौकशी अधिकारी, औरंगाबाद यांनी त्यांची चौकशी पूर्ण केलेली आहे. चौकशीच्या नस्तीमध्ये " रिझर्व्ह फॉर ऑर्डर " नमूद केलेले आहे. याबाबत लवकरच निकाल लागण्याची शक्यता आहे.

सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीने अशी अपेक्षा केली होती की, संबंधित तहसीलदारांवर विभागाने प्राथमिक गुन्हा (एफ.आय.आर.) दाखल केला असेल तर त्या तहसीलदारांची कोणत्याही प्रकारची मालमत्ता विकण्यात येऊ नये. तथापि, अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. परंतु यामध्ये केवळ रिजर्व्ह फॉर ऑर्डर एवढीच कार्यवाही विभागाकडून करण्यात आलेली आहे. सदर प्रकरण हे अडीच वर्षापासून प्रलंबित आहे, अशी भावना व्यक्त करून समितीने नाराजी व्यक्त केली. याबाबत सचिव, नियोजन (रोहयो) विभाग यांनी विभागीय प्रतिनिधींच्या माध्यमातून समितीला आश्वस्त केले की, या प्रकरणातील दोन्ही चौकशीसंदर्भातील अहवाल तीन महिन्यामध्ये शासनाला सादर करण्यात येतील व त्यानंतर त्याबाबतची माहिती समितीलाही पाठविण्यात येईल.

श्रीमती पाटील यांनी कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे. तरी देखील त्यांच्यावर फौजदारी गुन्हा का दाखल केला नाही ? अशी समितीने पृच्छा केली असता याबाबत उपायुक्त (रोहयो) यांनी विदित केले की, या पूर्वीच्या बैठकीत महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, " लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी सुरू असून उक्त प्रकरणाबाबत गंभीर शिक्षा प्रस्तावित केली आहे. " त्यावर समितीने निर्देश दिले की, नियोजन विभागाच्या सचिवांनी विभागीय आयुक्तांकडून आलेल्या अहवालातील बाबी तपासून त्यानंतर अंतिम अहवालाची माहिती समितीला दीड

महिन्याच्या आत देण्यात यावी. त्यावर सचिव, नियोजन (रोहयो) विभाग यांनी समितीला आश्वासन दिले की, या संदर्भातील सविस्तर व सखोल चौकशी अहवाल समितीला दिनांक ३१ जुलै, २०१८ पर्यंत सादर करण्यात येईल.

तहसीलदार कार्यालयाने निधी इतर विभागांना द्यावयाचा असतो. परंतु असे न करता तहसीलदार यांनी स्वतः कॅशबुक तयार करून संबंधित एजन्सीला दिलेले आहे. त्याचप्रमाणे त्यांनी खोटे हजेरीपट तयार करून अल्पवयीन लोकांच्या नावावर जमिनी घेतल्या आहेत. या गोष्टीला जवळपास अडीच वर्षे झालेली आहेत ज्यावेळेस अशा प्रकारचे अधिकारी भ्रष्टाचार केल्यानंतरही शासन प्रणालीमध्ये काम करीत असतील तर त्यांची भ्रष्टाचाराची इच्छा कमी होणार नाही, असे समितीने मत व्यक्त केले असता यासंदर्भात सचिव, नियोजन (रोहयो) विभाग यांनी प्रतिपादन केले की, या प्रकरणासाठी विभाग स्तरावर दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच विभागाने सामान्य प्रशासन विभागाला एक प्रस्ताव पाठविलेला आहे.

कळंब येथील बोगस हजेरीपटाचा अपहार किती कोटी रुपयांचा झालेला आहे, असे समितीने विचारले असता जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी सांगितले की, या प्रकरणामध्ये भ्रष्टाचार झालेला असल्यामुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांना दिनांक ३१ मे, २०१६ रोजी कळविण्यात आलेले असून त्यांना खुली चौकशी करण्यास परवानगी दिलेली आहे. तथापि, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून अद्यापपर्यंत अहवाल प्राप्त झालेला नाही. बोगस मस्टरचा अपहार हा १ कोटी ९ लाख ५३ हजार रुपयांचा आहे. याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी जे दोषारोपपत्र तयार करावयाचे असते व जे काही दोष सिद्ध करावे लागतील त्यासाठी कालावधी लागत असतो. यासंदर्भात सचिवांनी स्पष्ट केले की, परांडा आणि कळंब येथील प्रकरणे वेगवेगळी आहेत. या दोन्ही प्रकरणासाठी स्वतंत्रपणे विभागीय चौकशी करण्यात आलेली आहे. कळंब येथील प्रकरणामध्ये चौकशी करण्यात आलेली आहे. परांडा येथील प्रकरणामध्ये ३ कोटी १६ लाख ४२४ एवढ्या रक्कमेचा धनादेश आहे. यासंदर्भात विभागीय चौकशी पूर्ण करण्यात आलेली आहे. त्यामुळे या दोन्ही चौकशीचा अहवाल येणे प्रलंबित आहे. त्यामध्ये जर काही दंड करावयाचा असेल तर त्यासाठी तो अहवाल शासनाला पाठविणे आवश्यक आहे. दुसरे असे की, दुसऱ्या प्रकरणात हजेरीपटामध्ये खाडाखोड करण्यात आलेली आहे आणि त्यासाठी प्राथमिक गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर घटना ही सन २०१२ मध्ये घडलेली आहे. या कालावधीत असलेले तहसीलदार हे वेगळे होते. या प्रकरणामध्ये महिला तहसीलदार आढळून येत नाही. यामुळे एकदा जर प्राथमिक गुन्हा दाखल केला की, त्यामध्ये जरी कोणाचे नाव नसले परंतु दोष सिद्ध झाला तरी त्यांच्यावर दोषारोपपत्र दाखल होऊ शकते. यामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांना चौकशीची माहिती देण्यात आलेली आहे. याप्रकरणी सह सचिव, महसूल विभाग यांनी सांगितले की, समितीच्या साक्षीचा संदर्भ देऊन गृह विभागाला विनंती करण्यात येईल की, या संदर्भातील उघड चौकशीची कारवाई तातडीने पूर्ण करावी.

परांडा तालुक्याच्या तत्कालीन तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांना पुनःस्थापित करण्यात आल्याबद्दल समितीने नाराजी व्यक्त केली असता महसूल विभागाच्या सह सचिवांनी विदित केले की, नागपूर विभागात तहसीलदारांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त होती. त्या दरम्यान महसूल विभागामध्ये जे वेगवेगळ्या कारणास्तव मग लाचलुचपत प्रकरण असेल किंवा विविध कारणास्तव जे निलंबित लोक होते, त्या लोकांना पुनःस्थापित करून किमान अकार्यकारी पदांवर तरी ते भरावेत या दृष्टिकोनातून विचार झाला आणि या प्रकरणीसुद्धा चंद्रपूर येथे जी रिक्त पदे होती ती भरण्याच्या हेतूने त्यांना त्या वेळेस अकार्यकारी पदावर नियुक्ती देण्यात आली होती. यासंदर्भात सचिव (रोहयो) यांनी सांगितले की, जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालानुसार संबंधित तहसीलदाराने निलंबनाच्या नाराजीने मा. महसूल मंत्री यांच्याकडे अपील क्रमांक १५४५/२०१५ दाखल केले. शासन आदेश पुनस्थापना २५२५/ प्र.क.३९८/ई-४, दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५ अन्वये चौकशीच्या अधीन राहून त्यांना पुनःस्थापित केले आहे.

परांडा तालुक्याच्या तत्कालीन तहसीलदार यांची विभागीय चौकशी अद्यापपर्यंत पूर्ण न झाल्याबदल समितीने नाराजी व्यक्त केली व या प्रकरणी समितीच्या भावना लक्षात घेऊन चौकशीला दिरंगाई करण्यात येऊ नये. विभागीय चौकशीसाठी आवश्यक ती सर्व कार्यप्रणाली वापरण्यात यावी व त्यासाठी विहित कालावधी ठरविण्यात येऊन चौकशीची कार्यवाही लवकरात लवकर संपविण्यात येऊन त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा असे समितीने निर्देश दिले. तसेच उस्मानाबाद जिल्ह्यातील उपरोक्त प्रकरणांमध्ये स्थानिक नागरिकांकडून तक्रार प्राप्त झालेली आहे. तथापि, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून व शासनाकडून लाचलुचपत विभागाकडे तक्रार नोंदविली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले असता समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. लाचलुचपत विभागाकडून याप्रकरणाची सर्व माहिती व संबंधित कागदपत्रे समितीस सादर करण्यात यावी, असे समितीने निदेश दिले.

वास्तविक पाहता सहा महिन्यात विभागीय चौकशी पूर्ण झाली नाही तर कायद्यानुसार संबधित अधिकारी/कर्मचारी यांना पुनःस्थापित करावे लागते. सदर प्रकरण सन २०१३ मधील असून त्यास आता ५ वर्ष झाली आहेत, ५ वर्ष इतका कालावधी होऊन देखील विभागीय चौकशी पूर्ण होत नाही, दोषारोप पूर्ण होत नाही याबाबत समितीच्या बैठकांमध्ये बऱ्याच वेळा चर्चा झाली, तरीदेखील त्याबाबत कोणतीही कारवाई केली जात नाही, या उलट त्यामधून पळवाटा काढल्या जातात ही शासनाची विधीमंडळ समितीची व जनतेची फसवणूक आहे. त्यासंदर्भात समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

श्रीमती वैशाली पाटील यांची चौकशी ६ महिन्यांच्या आत न संपल्यामुळे त्यांना पुनः स्थापित करण्यात आले आहे. त्यामुळे समितीला असे सुचित करावसे वाटते की, नवीन विभागीय चौकशी अधिकारी नियुक्त करताना त्यांना ६ महिन्यात चौकशी बंधन पूर्ण करण्याचे बंधन घालण्यात यावे किंवा विभागीय चौकशीची मुदत १ वर्षापर्यंत वाढविण्यात यावी, अशा प्रकारचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात यावा तसेच सदरहू प्रकरणाची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे खुली चौकशी चालू असल्यामुळे त्यांना आवश्यक असलेली सर्व माहिती नियोजन (रोहयो) विभागाकडून उपलब्ध करून देण्यात यावी व त्यांना सदर चौकशी सहा महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावी असे समितीच्या बैठकीच्या अनुषंगाने निर्देश देण्यात यावे, यावर सचिव, नियोजन (रोहयो) विभाग यांनी स्पष्ट केले की, श्रीमती पाटील यांनी परस्पर ठेकेदाराला पेमेंन्ट केलेले आहे. यामध्ये अनियमितता झालेली आहे. तसेच हजेरीपटावरील खोडखोडीचा मुद्दा दुसरा असून त्यासंदर्भात संबंधितावर फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे. या अनुषंगाने समितीच्या बैठकीचा संदर्भ देऊन चौकशी अहवालासंबधी सकारात्मक भुमिका घेऊन शासनाकडून योग्य ती कारवाई करण्यात येईल.

उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये इतर तालुक्यातील संगणकाचे पासवर्ड वापरून पैशाचा अपहार करण्यात आला असल्याचे समितीला भेटीच्या वेळी निदर्शनास आले. त्याबाबत समितीने विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की, हे प्रकरण कळंब तहसील क्षेत्रातील असून या प्रकरणी संबधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर भारतीय दंड संहितेमधील कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, १६७ आणि ३४ तसेच अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्यापैकी काही लोकांना अटक झालेली आहे तसेच या प्रकरणात जे कंत्राटी कर्मचारी होते त्यांना सेवेतून काढून टाकण्यात आले असून त्यांना पुन्हा सेवेत सामावून घेतलेले नाही.

त्यावर समितीने सूचना केली की, या प्रकरणी संबधित अधिकारी/कर्मचारी यांची मालमत्ता जप्त करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत. अशा प्रकारे संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांची मालमत्ता जप्ती व दंडाची रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्यात आल्यास त्यांना आर्थिक फटका बसेल, असे समितीचे मत आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला देण्यात यावी, अशी समितीने शिफारस केली होती.

उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये इतर तालुक्यातील संगणकाचे पासवर्ड वापरून पैशाचा अपहार करण्यात आल्या प्रकरणी संबंधित दोषी अधिकारी/ कर्मचारी यांची मालमत्ता जप्ती व दंडाची रक्कम वसूल करण्यात आली काय, अशी समितीने विचारणा केली असता उप जिल्हाधिकारी (रोहयो) यांनी सांगितले की, संबंधितांवर एफआयआर दाखल होऊन दोषारोपपत्र न्यायालयात सादर केलेले असून त्यांची दिनांक १९ एप्रिल, २०१८ पुढील तारीख आहे. संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर दोषारोपपत्र दाखल झालेले आहे, तथापि दंडाच्या रकमेची निश्चिती झालेली नाही. दंडाच्या रकमेची निश्चिती झाल्यावर त्याबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

उपरोक्त प्रकरणामध्ये जे अधिकारी/कर्मचारी दोषी असतील त्यांची मालमत्ता जप्त करण्यात यावी व नवीन खरेदी करण्यात आलेल्या मालमत्तेची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला देण्यात यावी. या सर्व बाबींची उघड चौकशी करण्यात येऊन त्यासंदर्भातील अहवाल समितीला लवकरात लवकर देण्यात यावा.

**परिशिष्ट "अ"** मध्ये प्राप्त माहितीच्या अनुषंगाने विभागीय सचिव नियोजन, (रोहयो) उपसचिव, महसूल व अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या प्रमुखाची **दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी साक्ष घेण्यात आली. सदरील बैठकीत समितीने अपर मुख्य सचिव,** नियोजन (रोहयो) विभाग यांना असे विचारले की उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा तालुक्याच्या तत्कालीन तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांची विभागीय चौकशी सहा महिन्यांच्या आत पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत, तसेच त्यांच्यावर दोषारोप निश्चित करून फौजदारी गुन्हा दाखल केला आहे काय, याबाबतची माहिती समितीला सादर करावी तसेच श्रीमती वैशाली पाटील, तत्कालीन तहसीलदार कळंब/परांडा, जि. उस्मानाबाद यांच्या लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडून सुरू असलेल्या उघड चौकशीची सद्यःस्थिती समितीस अवगत करण्यात यावी. तसेच श्रीमती वैशाली पाटील यांचे निलंबन ६ महिन्यानंतर रद्द करून त्यांना अकार्यकारी पदावर चंद्रपूर येथे त्वरित का नेमण्यात आल्याची कारणे सांगावीत.

यावर उप सचिव, महसूल विभाग यांनी नमूद केले की, श्रीमती वैशाली पाटील या तहसीलदार, कळंब या पदावर कार्यरत असताना त्यांनी ज्या अनियमितता केल्या होत्या त्या संदर्भात त्यांना दि. १३ जुलै, २०१५ रोजी निलंबित करण्यात आले होते. दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५ रोजी त्यांना सेवेत पुनःस्थापित करण्यात आले आहे. त्यांना सेवेत पुनःस्थापित करताना दिनांक १ डिसेंबर, २०१५ रोजीच्या आदेशाद्वारे त्यांची अकार्यकारी पदावर नियुक्ती करण्यात आली होती. तहसीलदार हा विभागीय संवर्ग आहे. त्यामुळे त्यांना ज्या जिल्ह्यात निलंबित करण्यात आले होते, तो जिल्हा सोडून विभागामध्ये कोणत्याही जिल्ह्यामध्ये नियुक्ती करता येते. परंतु, दरम्यानच्या काळात विदर्भामध्ये खूप मोठ्याप्रमाणावर रिक्त पदे होती. गडचिरोली व

चंद्रपूर या ठिकाणी खूप मोठ्याप्रमाणावर पदे रिक्त असल्याने शासनाने विभागीय आयुक्त, नागपूर यांना प्राधिकृत केले होते की, तुम्ही तेथील स्थानिक परिस्थितीनुसार त्यांना अकार्यकारी पदावर नियुक्ती द्यावी. त्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, नागपूर यांनी त्यांना तहसीलदार, सेनगाव, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर या पदावर नियुक्ती दिली होती. त्या पदावर त्या जवळपास ३ महिने कार्यरत होत्या. दरम्यानच्या काळात नागपूर विभागाचे नायब तहसीलदार ते तहसीलदार या पदावर पदोन्नतीचे प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले होते. शासनाने त्या प्रस्तावांना मंजुरी दिली. त्यांना उस्मानाबाद जिल्हा सोडून औरंगाबाद विभागात नियुक्ती दिली पाहिजे होती. त्यानंतर पदोन्नतीद्वारे नागपूरमधील अधिकाऱ्यांना नागपूरमध्ये पदोन्नती दिली गेली.

दिनांक ७ मे, २०१६ ते दिनांक ३१ मे, २०१७ या कालावधीत महसूल सहाय्यक, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली या अकार्यकारी पदावर श्रीमती वैशाली पाटील यांना नियुक्ती देण्यात आली होती. दिनांक १ जून, २०१७ रोजी सेनगाव, तहसीलदार या पदावर नियुक्ती देण्यात आली. हे पद अकार्यकारी होते. यापूर्वी अकार्यकारी पदावर नियुक्ती देण्यात आली होती. मात्र जानेवारी, २०१९ रोजी आपल्याकडे झालेल्या साक्षीमध्येही हा विषय उपस्थित करण्यात आला होता. अकार्यकारी पदावर त्यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी समितीने शिफारस केली होती.

समितीने विचारणा केली की, परांडा प्रकरणामध्ये जी अफरातफर झाली किंवा निधीचा जो गैरवापर झाला तो किती आहे? यावर अपर मुख्य सचिव, नियोजन (रोहयो) विभाग यांनी समितीस असे सांगितले की, परांडा येथे जो गुन्हा सिद्ध झाला त्यामध्ये १६ लाख, ९ हजार, ८७९ रुपयांची आकडेवारी उपलब्ध झालेली आहे. समितीने अशीही विचारणा केली की, श्रीमती पाटील यांनी पदावर असतांना पैशांची अफरातफर केली, ते सिद्ध ही झाले. त्याकरीता त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे का त्याकरीता त्यांना काय शिक्षा झाली व संबंधीत अनियमिततेची रक्कम वसूल करण्यासंदर्भात काय कार्यवाही करण्यात आली. याबाबत अपर मुख्य सचिवांनी विदित केले की, समितीने उस्मानाबाद जिल्हा दौऱ्याच्या शिफरशी नुसार दिनांक १७ ऑक्टोबर, २०१८ मध्ये एक चौकशी सुरू झाली या चौकशीचा अहवाल दिनांक ८ फेब्रुवारी, २०२१ रोजी शासनास सादर केला, विभागाने असा एक अभिप्राय घेतलेला आहे की, आधीच्या ज्या चौकश्या पूर्ण झालेल्या आहेत, त्यावर कारवाई करू या. लाचलुचपत प्रतिबंध विभागाचा जो अहवाल आता आलेला आहे, त्यावर वेगळी कारवाई करू, असा एक निर्णय आम्ही घेतलेला आहे. दोन चौकशांवर काय कारवाई करायची, ते आम्ही मंत्री महोदयांकडे सादर केलेले आहे. ते मान्य झाल्यावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (एमपीएससीची) मान्यता घ्यावी लागेल व नंतर याबाबतचे आदेश देवू. आम्ही काय कारवाई सुचविलेली आहे ते मी वाचून दाखवतो.

पहिली चौकशी कळंब तालुक्याची होती. त्यामध्ये श्रीमती वैशाली पाटील निलंबित झाल्या होत्या. त्याबाबत आम्ही अशी कारवाई सुचविली आहे की, श्रीमती वैशाली पाटील तत्कालीन तहसीलदार यांची पुढील वेतनवाढ ५ वर्षांच्या कालावधीसाठी कायमस्वरूपी रोखण्यात यावी.

दुसरी चौकशी परांडा तालुक्याची होती. ती पूर्ण झालेली आहे. त्यामध्ये १६ लाख, ९ हजार, ८७९ रुपयांचा अपहार सिद्ध झालेला आहे. तेथे आम्ही असे म्हणत आहोत की, श्रीमती वैशाली पाटील तत्कालीन तहसीलदार यांच्याकडून शासनाच्या झालेल्या नुकसानाची रुपये १६ लाख,९ हजार ८७९ ही रक्कम त्यांच्या मासिक वेतनातून दरमहा १५ हजार रुपयांप्रमाणे संपूर्ण वसूल करण्यात यावी. त्यांची पुढील वेतनवाढ ५ वर्षांच्या कालावधीसाठी कायमस्वरूपी रोखण्यात यावी.

समितीने अशी विचारणा केली की, परांडा तालुक्यातील ३ कोटी, ८३ लाख रुपये वैयक्तिकरीत्या खात्यातून काढले केले गेले तसेच याप्रकरणी काय कार्यवाही केली चौकशीत हा मुद्दा आला नाही, याचे कारण काय आहे, हे वगळले व कोणी बनवेल एवढी गंभीर गोष्ट होऊन त्याची नोंद नाही व चौकशीही नाही याबाबत योग्य तो खुलासा करण्यात यावा यावर उप जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी समितीला माहिती देताना असे सांगितले की, श्रीमती वैशाली पाटील, तहसीलदार यांच्या कार्यकाळात ज्या काही रक्कमा काढण्यात आलेल्या आहेत, त्या खालीलप्रमाणे.

परांडा तालुक्यामध्ये श्रीमती वैशाली पाटील, तहसीलदार म्हणून कार्यरत असताना अकुशल रक्कम मस्टरवरची जी रक्कम होती, ती १,१३,४७,७५३ इतकी होती, ती त्यांनी वितरित केली. कुशल रक्कम म्हणजे मटेरियल वर्ककरिता देत असतो, ती ३,१६,९४,५३६ रुपये इतकी होती. अशी एकूण रक्कम ४,३०,४२,२८९ रुपये इतकी होती. आता यामध्ये जी अकुशल रक्कम आहे, ती हजेरीपटावर खाडाखोड करणे, व्हाईटनर लावणे अशा अनियमितता यामध्ये झालेल्या आहेत. यामध्ये ०८ अभियंता होते, त्यांची देखील त्या हजेरीपटावर नावे आहेत. हे सर्व संगनमताने झालेले दिसून येत आहे. अशा एकूण हजेरी पत्रकांची संख्या २२५ इतकी होती. या २२५ हजेरी पत्रकांमध्ये १,१३,४७,७५३ रुपये इतकी रक्कम गुंतलेली आहे. त्यामध्ये रकमेत खाडाखोड केलेल्या हजेरी पत्रकांची संख्या १२५ आहे. नावात खाडाखोड केलेल्या हजेरी पत्रकांची संख्या १६२ आहे. व्हाईटनर लावून खाडाखोड केलेल्या हजेरी पत्रकांची संख्या ११४ इतकी आहे. हे सर्व लक्षात घेता आम्ही या संदर्भात फौजदारी गुन्हा दाखल केला होता. यामध्ये जबाबदार शाखा अभियंता आहेत, उप अभियंतादेखील आहेत. हे प्रकरण पोलिसांसमोर चौकशीकरिता आहे.

तसेच यावर अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग (रोहयो) यांनी असे सांगितले की, आरोपामध्ये असे लिहिलेले आहे की, त्या अधिकाऱ्याने स्वतः खात्यामध्ये पैसे टाकले नाही तर ठेकेदारांना दिलेले आहे. ज्यांनी अकुशल काम केले, त्यांना पैसे दिलेले आहे. तेही त्यांना डायरेक्ट देता येत नाही, ते काम त्यांनी केलेले आहे. हाही एक आरोप आहे. त्यांनी स्वतःच्या खात्यामध्ये काढून ठेवलेले असाही उल्लेख नाही. ग्रामपंचायतीने काम केले असेल आणि त्यांनी एखादा पुरवठादार लावला असेल तहसीलदाराने ग्रामपंचायतीला पैसे द्यावे, ग्रामपंचायतीने संबंधित ठेकेदाराला पैसे देणे अभिप्रेत आहे. यामध्ये त्यांनी हे चॅनेल फॉलो केलेले नाही, खाडाखोड कॅशबूकमध्ये फार आहे. या बाजूने न नोंदता दुसऱ्या बाजूने नोंद केलेली आहे.

याबाबत, उप-जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांनी असे नमूद केले की, यामध्ये व्यक्तिशः प्रदान झालेले नाही, यामधील रक्कम ठेकेदाराला ठेकेदाराच्या खात्यावर दिलेली आहे. बँकेचा ताळमेळ घेतलेला आहे, यामधील कॅशबूकच्या नोंदी आणि बँकेचा ताळमेळ यामधील फरक १६ लाखांचा आहे. याबाबत माझ्याकडे तपशील आलेले आहे. धनादेश क्रमांकासहित आम्ही सर्व तपासणी केलेली आहे कोणता धनादेश कोणाला गेलेला आहे, याची तपासणी केलेली आहे. कोणताही धनादेश वैशाली पाटील यांना गेलेला नाही. १४९ व्यक्तीगत ठेकेदार आहेत, त्यांना धनादेशाद्वारे ३.१६ लाख रुपयांचे वितरण झालेला आहे. कॅशबूक नोंदी आणि बँक ताळमेळ तपासल्या असता १६ लाखांची तफावत आलेली आहे.

कोणत्याही शासकीय पैशांचा गैरव्यवहार झाल्यास त्याची वसुली व्याजासहित व्हावी असे समितीचे मत आहे. तसेच दिनांक १५ मे, २०१८ रोजी समितीच्या झालेल्या बैठकीमध्ये श्रीमती वैशाली पाटील यांच्यावर ९ चार्जशीट दाखल करण्यात आल्याबाबत सांगितले गेले. त्या ९ दोषारोपाबाबतची माहिती द्यावी याबाबत अपर मुख्य सचिव नियोजन विभाग (रोहयो) यांनी असे विदित केले की, परांडा येथील चौकशीमध्ये श्रीमती पाटील यांच्यावर ९ दोषारोप ठेवण्यात आले. त्या चौकशीत ठेवण्यात आलेल्या ९ दोषारोप खालील प्रमाणे :—

१) श्रीमती वैशाली पाटील, तहसीलदार, परांडा या पदी रुजू होण्यापूर्वीच्या जमा व खर्चाच्या नोंदीवर स्वाक्षरी करणे.

२) रोहयो अंतर्गत झालेल्या कामाच्या उचल देयकाचे धनादेश कार्यान्वित यंत्रणे ऐवजी गुत्तेदारांच्या नावे अदा करणे.

३) रोखपुस्तिके प्रमाणे निर्गमित केलेल्या धनादेशाचा क्रमांक रोखपुस्तिकेमध्ये नमूद नसणे किंवा चुकीचा नमूद करणे.

४) रोखपुस्तिके प्रमाणे धनादेशाची जी रकम नमूद आहे त्यापेक्षा अधिक रकमेचे धनादेश आहरित करणे.

५) रोखपुस्तिके प्रमाणे धनादेशाची जी रकम नमूद आहे त्यापेक्षा कमी रकमेचे धनादेश आहरित करणे.

६) रोखपुस्तिकेमध्ये खर्च बाजूस दर्शविण्यात आलेले धनादेश रद्द करून जमा बाजूस नोंदवणे तथापि, धनादेश रद्द करण्याची कोणतीही कारणमीमांसा न देणे.

७) बँक तपशीलानुसार आहरित न झालेले धनादेश रोखपुस्तिकेमध्ये खर्च बाजूस नोंदवणे.

८) बँक तपशीलानुसार आहरित झालेले धनादेश रोखपुस्तिकेमध्ये न नोंदवणे.

९) रोखपुस्तिकेमध्ये पदभार घेतल्याबाबत किंवा त्यांच्या नंतरच्या तहसीलदारांना रोखपुस्तिकेचा पदभार दिल्याबाबत कोणतीही नोंद न घेणे.

तद्नंतर उप जिल्हाधिकारी (रोहयो), उस्मानाबाद यांनी समितीस अशी माहिती दिली की, तहसीलदार, परांडा यांनी या संदर्भात दिनांक २ फेब्रुवारी, २०१९ रोजी एफ.आय.आर. दाखल केला आहे. चौकशी कोणत्या स्तरावर सुरू आहे व ती किती वेगाने सुरू आहे, याबाबत अधिकाऱ्यांनी स्पष्टीकरण द्यावे अशी विचारणा केली असता उप जिल्हाधिकारी (रोहयो), उस्मानाबाद यांनी या संदर्भात गुन्हा दाखल केलेला आहे. पोलीस अधिकाऱ्यांकडून माहिती घ्यावी लागेल अशी विदित केले.

समितीच्या असे निर्देशनास आले की, श्रीमती पाटील यांना वाचविण्याकरिता काही यंत्रणा काम करीत असल्याचे दिसून येत आहे. मागच्या समिती प्रमुखाने विधान केले की, विभागाचे अधिकारी खटला न्यायालयामध्ये टिकू नये यासाठी सहाय्य करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

अपर मुख्य सचिव नियोजन विभाग (रोहयो) यांना असे सांगितले की, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे ती चौकशी दिली गेली. त्यांना अशा पद्धतीने चौकशी करावयाची आहे की, न्यायालयात प्रकरण जाणार असल्याने न्यायालयामध्ये आपली बाजू खंबिरपणे उभी राहिली पाहिजे. याबाबत उपजिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी समितीस सांगितले की, सदर प्रकरणामध्ये तीन विभागीय चौकश्या सुरू आहेत. एसीबीकडून अपसपदे बदलचा याचा रिपोर्ट गेलेला आहे.

समितीने विचारणा केली की, श्रीमती पाटील यांच्या प्रकरणामध्ये १६ लाखांचा अपहार झालेला आहे. त्यांनी ३ कोटी ४४ लाखांची रक्कम अधिकार नसताना काढली त्याबाबतचा गुन्हा दाखल केलेला नाही, ६ महिन्यांमध्ये चौकशी पूर्ण झाली नाही पुढच्या चौकशीमध्ये आणखी काही मुद्दे

निघतील. शासकीय यंत्रणेचा अधिकाऱ्यांवर दबावच नाही ही परिस्थिती निर्माण झाली एसीबीचे काय झाले, फौजदारी गुन्हा दाखल केल्यावर २ वर्षे झाली, त्याची कोणी चौकशी करायला तयार नाही. शासनाचा, आणि पर्यायाने जनतेचा पैसा गेलेला आहे. त्या पैशाचे काय झाले, त्याबाबत त्यांच्यावर काय कारवाई झाली.

अपर मुख्य सचिव यांनी सागितले की, येथेही श्रीमती वैशाली पाटील यांची बाजू कोणीच घेत नाही. आपण प्रक्रियेमध्ये कसे अडकतो त्याबाबत मी सांगत आहे. श्री. डवले यांची साक्ष झाली होती तेव्हाही दोन चौकशा पूर्ण झाल्या होत्या. तेव्हाही कारवाई करून मोकळे होता आले असते. परंतु, तिसऱ्या चौकशीची वाट पाहू अशी चर्चा झाली. आपण पुन्हा नवनवीन चौकशी सुरू करत आहोत. आपण असे ठरवले असेल की, सर्व चौकश्या पूर्ण झाल्यानंतर कारवाई करू आणि तरीही आपण नवीन चौकशी लावत राहिलो तर ती कधीही पूर्ण होणार नाही. त्यामुळे आपल्याला हे ठरवावे लागेल की, जी चौकशी आधी पूर्ण झालेली आहे, त्यावर कारवाई करायची आणि जेव्हा पुढची चौकशी होईल तेव्हा पुढची कारवाई करायची. असे केले तर काही तरी कारवाई होईल. सर्व एकत्र करून कारवाई करण्याबाबतचा जर आपण विचार करत असू तर कारवाई होण्यास खरेच वेळ लागणार आहे.

समितीने अशी विचारणा केली की, दोन चौकशी झाल्या आहेत तिसऱ्या चौकशीकरीता कोणती कालमर्यादा निश्चित केलेली आहे ?

अपर मुख्य सचिव नियोजन विभाग (रोहयो) यांनी विदित केले की, परांडा आणि कळंब येथील चौकशीला अनुक्रमे ९ आणि ८ दोषारोप पत्रे आहेत तिसऱ्या एसीबी चौकशीकरीता एकूण ७ दोषारोप पत्रे आहेत.  ही शिक्षा विभागाने सुचविलेली आहे, तरी देखील तिसऱ्या चौकशी नंतर यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांच्या निर्णयाची वाट पाहत आहोत. दंडावर व्याजाच्या वसूलीसंदर्भात निर्णय घेण्यात येईल. वेतनवाढ रोकणे, त्यानंतर नोकरीवरुन निलंबित याशिवाय कठोर आणखी कोणतीही शिक्षा नाही. पाच वर्षे वेतनवाढ रोकणे म्हणजे ती खूप मोठी शिक्षा होते. सेवानिवृत्तीनंतर त्यांचे खूप नुकसान होते.

एसीबी कोणती चौकशी करीत आहे अशी समितीने विचारणा केली असता याप्रकरणी अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी यामध्ये तहसीलदार यांच्या वैयक्तिक मालमत्तेची चौकशी व्हावी, म्हणून तक्रारअर्ज आले होते. त्याप्रमाणे त्यांची परवानगी घेण्याकरिता शासनाकडे गेले. शासनाकडून ३१/५/२०१६ रोजी परवानगी मिळाली. यानंतर याची चौकशी डीवायएसपी, एसीबी उस्मानाबाद करीत आहेत. त्यांच्या वेगवेगळ्या चौकश्या झालेल्या आहेत. त्याचे वेगवेगळे अहवाल देखील आलेले आहेत. त्यानंतर आमच्या वरिष्ठ कार्यालयातून त्रूटी निघाल्या की, यावर अलीकडच्या अहवालावरून सहा मुद्दयांवर चौकशी करणे बाकी आहे. औरंगाबाद एसपी यांनी काल रोजी आमच्याकडे अहवाल सादर केलेला आहे. सहा मुद्दयांची चौकशी करण्याकरिता आम्हाला दोन आठवडे लागतील. सहा मुद्दे वैयक्तिक मालमत्तेविषयी आहेत. त्यांच्या स्वतःच्या नावे सांगली मिरज, कुपवाडा शहर मनपा हद्दीतील, सर्व्हे नंबर १३० मधील मालमत्तेविषयी, मूळ गाव नोकरी केलेल्या ठिकाणी स्थावर मालमत्तेची खरेदी केलेली आहे, त्याची चौकशी करणे बाकी आहे. पारपत्र धारण केलेले आहे तर परदेशवारीचा खर्च चौकशी, म्युच्युअल फंडस शेअर्स गुंतवणुकीची चौकशी काही झालेली आहे, काही करायची आहे. त्यांच्या आईच्या नावे असलेल्या घराच्या बांधकामाचा खर्च याची देखील चौकशी बाकी आहे. याप्रमाणे आपण हे सर्व मुद्दे पाठविलेले आहेत. याबाबत पोलीस अधीक्षक औरंगाबाद यांचे आम्हाला पत्र आलेले आहे. ही चौकशी पूर्ण करून अहवाल दोन महिन्याच्या आत सादर करणार आहेत, असे त्यांचे पत्र आम्हाला आलेले आहे. वैयक्तिक अपसंपदा आहे की नाही हा निष्कर्ष त्यानंतर निघेल असे नमूद केले.

विभागीय चौकशी आपण किती दिवसात संपवून किती दिवसात कारवाई सुरू करणार आहात अशी समितीने विचारणा केली असता, याबाबत लाचलुचपत प्रतिबंध, विभागाची चौकशी वेगळी आहे. या दोन चौकशांवर दंड व शिक्षा सुनाविलेली आहे. तिसऱ्या चौकशीचा अहवाल शासनाकडे ०८ फेब्रुवारी २०२१ रोजी आलेला आहे. त्यावर निर्णय होईल. सामान्य प्रशासन विभागाकडे सदर नस्ती सादर केलेली आहे. याबाबत सह सचिव नियोजन विभाग (रोहयो) यांनी असे सांगितले की, तसेच दोन चौकशांमध्ये शिक्षा प्रस्तावित केलेली आहे, मंत्री महोदयांकडे सहीकरिता फाईल गेलेली आहे. तिसऱ्या चौकशीमध्ये फौजदारी गुन्हा दाखल असल्यामुळे तो दोषारोप आणि हा दोषारोप एकच असल्यामुळे दोन्ही चौकशी अहवालाकरिता थांबावे की कसे याकरिता सामान्य प्रशासन विभागाकडे मत मागविले आहे.  यावर विभागीय अपर मुख्य सचिव यांनी अधिकची माहिती देताना नमूद केले की याप्रकरणी ३ चौकश्या आहेत. त्यातील २ मध्ये आम्ही सर्व शिफारशी केल्या आहेत. त्यावर भरपूर चर्चाही झाली. तिसऱ्या चौकशीबाबत आता चर्चा सुरू आहे. लाचलूचपत प्रतिबंधक विभागाची चौथी चौकशी आहे. या चौकशीला आपण वेगळे करीत आहोत. तिसऱ्या विभागीय चौकशीवर एफआयआर दाखल केलेला आहे. पहिली चौकशी कळंबची आहे, त्यामध्ये ८ दोषारोप आहेत. ते सिद्ध झाले. त्यामध्ये आम्ही ५ वर्षे वेतनवाढ कायमस्वरुपी थांबवणार आहोत. त्यामध्ये वसुलीचा मुद्दा नाही. दुसरी चौकशी परांडाची आहे. त्यामध्ये दोषारोप सिद्ध झाल्यानंतर १६ लाख रुपयांची वसुली आहे. त्यामध्येही आम्ही ५ वर्षे वेतनवाढ कायमस्वरुपी थांबवणार आहोत. तथापि यामध्ये तीन यंत्रणा सामिल आहेत. एक प्रकरण सामान्य प्रशासन विभागाकडे गेलेले आहे. दुसऱ्या प्रकरणामध्ये एफआयआर वर होणाऱ्या कारवाईची वाट पाहणे. त्यामुळे यामध्ये न्यायालयपण येईल. यामध्ये सामान्य प्रशासन विभागाने आम्हाला न्यायालयाची निर्णयाची प्रतिक्षा करण्यास सांगितले असल्याने याबाबत आता काहीही करता येत नाही.

यावर समितीने सांगितले की, मा. सर्वोच्च न्यायालयाने असा आदेश दिला आहे की अशा प्रकरणांमध्ये ९० दिवसांत त्या प्रकरणाचा निर्णय आला पाहिजे.

**अभिप्राय :-**

(१) समितीच्या दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजीच्या बैठकीत सचिवांनी साक्षीच्या वेळी विदित केले की, श्रीमती पाटील, तत्कालीन तहसिलदार यांचा कळंब येथील बोगस हजेरीपटाचा अपहार हा १ कोटी ९ लाख ५३ हजार रुपयांचा आहे. सदरहू प्रकरणी भ्रष्टाचार झालेला असल्याने त्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्याकडून चौकशी करण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला असून त्यासंदर्भात त्यांना दिनांक ३१ मे, २०१६ रोजी कळविण्यात आले आहे. तसेच परांडा येथील प्रकरणामध्ये ३ कोटी २५ लाख एवढ्या रकमेचा धनादेश एजन्सीच्या नावे न देता संबंधित ठेकेदारांच्या नावे देण्यात आला आहे. श्रीमती पाटील पदावर रुजू होण्यापूर्वी जमा खर्चाच्या नोंदीवर स्वाक्षरी केली. सदरील धनादेश कार्यान्वित यंत्रणेऐवजी ठेकेदाराच्या नावे करून रोख पुस्तिकेतील क्रमांकानुसार धनादेशसुद्धा नसणे, जी रक्कम नमूद आहे त्यापेक्षा अधिक रक्कमेचा धनादेश दिला रोखपुस्तिकेत नमूद असलेल्या रक्कमेपैकी कमी धनादेश देण्यात आला, सदरील धनादेश रद्द केल्यानंतर त्याची कारणे दिलेली नाहीत. बँकेच्या विवरणपत्रानुसार आहारीत न झालेले धनादेश रोख पुस्तिकेत खर्च बाजूस नोंदविण्यात आलेला नाही. रोख पुस्तिकेत पदभार घेतल्याबाबत कोणतीही नोंद नाही असे आरोप नमूद केले आहेत. परांडा येथील प्रकरणासंदर्भात त्यांची चौकशी अहवाल विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी त्यांच्या दिनांक १२ मार्च, २०१८ रोजीच्या पत्रान्वये अंतिम निर्णयाखाली नियोजन (रोहयो) विभागाकडे सादर केला आहे. याप्रकरणी उघड चौकशीचा अहवाल लाचलुचपत प्रतिबंधक विभागास उशिरा सादर केला. निलंबित अधिकारी/कर्मचारी यांना ६ महिन्यानंतरही कामावर पदोन्नतीच्या पदावर रुजू करण्यात आले. उस्मानाबाद जिल्ह्यात तहसीलदार पदावर कार्यरत असताना त्यांच्याकडे असलेल्या बेनामी संपतीची लाचलुचपत विभागाकडून चौकशी अद्यापपर्यंत पूर्ण झालेली नाही, याप्रकरणी दिनांक २ फेब्रुवारी, २०१९ रोजी म्हणजे घटनेच्या चार ते पाच वर्षांनी गुन्हा नोंदविण्यात आला आहे तसेच याप्रकरणी वेगवेगळ्या चौकश्या लावून त्या काहीतरी कारणांनी प्रलंबित ठेवून त्याचा अहवाल सादर करण्यास विलंब लावणे, यावरुन सदरील प्रकरण न्यायालयात टिकू नये यासाठी शासकीय यंत्रणा सहाय्य करीत असल्याचे समितीचे एक मत झाले.

**शिफारस :-**

**कळंब व परंडा या दोन्ही तालुक्यात रोहयोच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराबाबत समितीने सन २०१५-१६ च्या अहवालातील शिफारशीवर व समितीने वेळोवेळी दिलेल्या एकाही निदेशाचे पालन होत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे व यासंदर्भात करण्यात येत असलेल्या चौकशीच्या नावाखाली वेगवेगळया चौकश्या लावण्यात आल्याने याबाबत संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांना कुठेतरी पाठीशी घालण्यात येत असल्याचे विभागीय यंत्रणेकडूनच प्रयत्न होत असल्यामुळे गैरव्यवहार/ भ्रष्टाचार करणारे दोषी अधिकारी/कर्मचारी भ्रष्टाचार केल्यानंतरही शासन प्रणालीमध्ये काम करीत असतील तर त्यांची भ्रष्टाचार करण्याची प्रवृत्ती तशीच राहील असे समितीने मत व्यक्त केले. त्यामुळे यासंदर्भात प्रलंबित असलेल्या सर्व चौकश्या त्वरीत पूर्ण करण्याकरिता आवश्यक ती सर्व कार्यप्रणाली वापरुन श्रीमती पाटील, तत्कालिन तहसीलदार यांना तसेच संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांना न्यायालयाच्या मर्यादेच्या व निर्णयाच्या अधिन राहून त्यांची सेवा समाप्त करण्यात येवून शासनाच्या झालेल्या नुकसानीची भरपाई त्यांच्याकडून करण्यात यावी व त्यांच्या मालमत्तेचीही चौकशी लवकर पूर्ण करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांत सादर करण्यात यावा अशी शिफारस समिती करीत आहे.**

**अभिप्राय :-**

(२) उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा तालुक्याच्या श्रीमती वैशाली पाटील, तत्कालीन तहसिलदार यांनी केलेल्या गैरव्यवहार व अनियमिततेबाबत त्यांना दिनांक १३ जुलै, २०१५ रोजी निलंबित करण्यात आले होते. त्यानुसार त्यांची सहा महिन्याच्या आत विभागीय चौकशी पूर्ण करण्यात येऊन त्यांची सेवा समाप्त होणे अपेक्षित होते. जेणेकरुन त्यामुळे रोहयोच्या योजनेसंदर्भात लोकांमध्ये चांगला संदेश आणि मनामध्ये विश्वास निर्माण झाला असता अशी समितीने भावना व्यक्त केली. परंतू विभागीय चौकशीचा कालावधी विविध कारणे देऊन वाढविल्यामुळे त्यांना सेवेत पुनःस्थापित करण्यात आले. सदर प्रकरण सन २०१३ मधील असून समितीने माहे जून, २०१५ मध्ये उक्त जिल्ह्यास प्रत्यक्ष भेट दिली त्यावेळी सदर प्रकरण उघडकीस आले. त्यास जवळपास ६ वर्षे पूर्ण होऊन देखील अद्यापपर्यंत विभागीय चौकशी पूर्ण झालेली नाही. यासंदर्भात समितीच्या चौथ्या अहवालात (सन २०१५-२०१६) शिफारस करुन व त्यानंतरही सन २०१७, २०१८, २०१९ व २०२१ च्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठकीमध्ये वेळोवेळी चर्चा करण्यात आली. रोजगार हमी योजना कामावर झालेला भ्रष्टाचार/गैरप्रकार/अनियमितता याबाबत महाराष्ट्र नागरी सेवा तरतुदीनुसार अधिकारी/कर्मचारी दोषी असल्यास विभागीय आयुक्तांना व्यापक अधिकार असतानाही याबाबत उचित कारवाई झालेली नाही अनेकदा ही बाब सचिव, नियोजन (रोहयो) विभाग व सह/उप सचिव, महसूल यांच्या निदर्शनास आणून देखील संबंधित विभागांनी दोषींवर कोणतीच कारवाई अद्यापपर्यंत केली नाही. याबाबत समितीने तीव्र स्वरुपात पुन्हा नाराजी व्यक्त केली आहे.

**शिफारस :-**

**तहसिलदार, परांडा यांनी केलेल्या या गैरव्यवहारप्रकरणी समितीने विभागाच्या सन २०१७ पासून आतापर्यंत एकूण चार साक्षी घेतल्या असतानाही सदरील प्रकरण अजूनपर्यंत विभाग गांभिर्याने घेत नाही आहे. श्रीमती पाटील व संबंधित दोषी अधिकारी यांना वाचविण्याकरिता महसूल नियोजन (रोहयो) व गृह विभागाच्या वेगवेगळया चौकशीमध्ये प्रकरण अडकवून विभागीय चौकशीचा कालावधी वेळोवेळी जाणूनबुजून वाढविण्यात येत आहे. त्यांना विभागाच्या यंत्रणेकडून पाठिशी घालण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे समितीचे स्पष्ट मत झाले आहे. त्यामुळे श्रीमती पाटील व संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द सुरु असलेल्या चौकशीस जाणीवपूर्वक विलंब करुन दोषींना पाठिशी घालणाऱ्या विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांचीही चौकशी करण्यात यावी व दोषी आढळून आलेल्या संबंधितांविरुध्द कडक शिस्तभंगाची व दंडात्मक स्वरुपाची कारवाई करण्यात यावी, तसेच दोन्ही प्रकरणात करण्यात आलेल्या अपहाराची रक्कम त्यांच्या वेतनातून वसूल करावी जेणेकरून यापूढे रोहयोच्या कामामध्ये सुसुत्रता येवून गैरव्यवहारास आळा बसेल. तसेच या प्रकरणी विभागीय आयुक्त यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) तरतुदीनुसार परिच्छेद १(६) कलम ६-अ दिनांक ६ डिसेंबर १९८० नुसार देण्यात आलेल्या व्यापक अधिकारांचा वापर करून याप्रकरणी संबंधित दोषींवर त्वरित कारवाई करावी. तरी उपरोक्त प्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**अभिप्राय :-**

(३) दिनांक २० जून, २०१८ रोजीच्या बैठकीत श्रीमती वैशाली पाटील त्यांच्या संदर्भात चौकशी अधिकारी नेमून सविस्तर व सखोल चौकशी करून महिन्याच्या आत समितीला अहवाल सादर करण्यात यावा तसेच श्रीमती पाटील, तत्कालीन तहसीलदार, परांडा/कळंब व इतर दोषी व्यक्तींची मालमत्ता तपासण्यात येऊन त्यांची लाचलुचपत विभागाकडूनही उघड चौकशी विहित कालावधीत पूर्ण करण्यात यावी, असे निर्देश दिले होते. तसेच दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या बैठकीत समितीने उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा तालुक्यातील तत्कालीन तहसीलदार श्रीमती पाटील यांच्या विभागीय चौकशी संदर्भात विचारणा केली असता समितीस समाधानकारक माहिती मिळाली नाही. तथापि, श्रीमती पाटील यांच्या विभागीय चौकशीचा व उघड चौकशीचा अहवाल अद्यापपर्यंत समितीला सादर करण्यात आलेला नाही. तसेच समितीचे सभागृहास सादर केलेल्या सन २०१५-२०१६ च्या अहवालातील शिफारशीवर कोणतीही कार्यवाही अद्यापपर्यंत करण्यात आलेली नाही, शासकीय यंत्रणेतील गैरव्यवहाराच्या चौकश्या ६ महिन्यात पूर्ण करण्याचे बंधनकारक असतानाही वेगवेगळी कारणे देऊन चौकशीचा कालावधी वाढविण्यात येवून संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना पाठीशी घालण्याची संधी शासकीय यंत्रणेकडून घेतली जाते त्यामुळे दोषी अधिकारी/कर्मचारी यांना कुठेतरी जरब बसावा याकरिता चौकशींचा कालावधी तीन महिन्याचा करणे आवश्यक वाटते असे केल्यास विहीत कालावधीत प्रकरणांमध्ये निर्णय घेणे शक्य होऊन संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांना कमी विहित कालावधीत शिक्षा करणे अधिक सोपे हाईल.

**शिफारस :-**

**शासकीय यंत्रणेत काम करणारे अधिकारी कर्मचारी हे ज्यावेळी शासनाच्या कामात गैरव्यवहार अनियमितता करतात अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या चौकशीचा कालावधी वेळोवेळी वाढवून प्रकरण प्रलंबित ठेऊन शासकीय यंत्रणेकडून एकप्रकारे त्यांना अभय देण्यात संबंधित यंत्रणेला वाव मिळतो. त्यामुळे शासकीय यंत्रणेतील गैरव्यवहार अनियमितता याप्रकरणी दोषी अधिकारी /कर्मचारी यांच्यावरील घेण्यात येणाऱ्या चौकश्या विहीत वेळेत पूर्ण करणे आवश्यक वाटते, कारण ६ महिन्यांच्या आत चौकशी करणे व त्यानंतर मुदतवाढीचा फायदा संबंधित दोषीं अधिकारी/कर्मचारी यांना होतो त्यामुळे शासनाने यापुढे कोणतीही चौकशी तीन महिन्यांच्या कालावधीतच पूर्ण करणे बांधनकारक करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने नियमात आवश्यक तो बदल करण्यात यावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीने तीन महिन्यांत सादर करावा अशी शिफारस ही समिती करीत आहे.**

**(पाच) सामाजिक वनीकरण :**

उस्मानाबाद तालुक्यातील ढोकी येथील रोपवाटीकेमध्ये सामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून ४ लाख रोपे तयार करण्यात आली. तथापि, रोपवाटिकेमध्ये तयार करण्यात आलेल्या रोपांचे वितरण व्यवस्थितरित्या करण्यात आले नाही. रोपवाटिकेमध्ये तयार करण्यात आलेली रोपे पावसाच्या अभावी जळून गेली, असे जिल्हा यंत्रणेच्या अधिकाऱ्यांकडून समितीला सांगण्यात आले. याप्रकरणी समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

सामाजिक वनीकरणांतर्गत रोपवाटिकांमधील रोपे जिवंत ठेवण्यासाठी पुरेसे लक्ष देणे गरजेचे होते. मात्र सामाजिक वनीकरणाच्या योजनेतून जिल्ह्यामध्ये झालेला खर्चाचा विचार केला तर फलनिष्पती नगण्य झाल्याचे समितीला निदर्शनास आले. ही बाब पर्यावरणाच्या तसेच राज्याच्या विकासाच्या दृष्टीने हानीकारक आहे. समितीच्या मते या योजनेकडे वन विभागाच्या संबधित कर्मचाऱ्यांनी पुरेसे लक्ष दिलेले नाही. यास्तव झाडांच्या

लागवडीसंदर्भात केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करून वृक्षारोपण अधिकाधिक चांगल्या रितीने करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत तसेच ढोकी येथील रोपवाटीकेच्या संदर्भात संबधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात येऊन त्यासंदर्भातील अहवाल समितीला सादर करण्यात यावा, अशी समितीने शिफारस केली होती.

उपरोक्त शिफारशीच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीत असे नमूद केले आहे की, तहसीलदार, उस्मानाबाद यांनी दिनांक १८ सप्टेंबर, २०१५ रोजी रोपवाटीकेची पाहणी करून त्यांचे पत्र दिनांक २१ सप्टेंबर, २०१५ अन्वये अहवाल सादर केला आहे. त्यात रोपवाटीकेशी निगडित असलेले तत्कालीन तालुका कृषि अधिकारी, उप विभागीय कृषि अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. चौकशी अहवालात आढळून आलेल्या त्रुटी/उणिवासाठी जबाबदार कृषि अधिकारी/कर्मचारी यांच्यावर योग्य ती कारवाई करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा म्हणून विभागीय कृषि सहसंचालक, लातुर विभाग यांना दिनांक २५ जानेवारी, २०१६ रोजी पत्रान्वये कळविले आहे.

उक्त प्रमाणे सदरील प्रकरणी जबाबदार अधिकारी हे महाराष्ट्र कृषि सेवा गट (अ) व गट (ब) या संवर्गातील असल्यामुळे नियुक्ती अधिकारी तथा शिस्तभंग विषयक प्राधिकारी हे शासन असल्यामुळे त्यांच्या विरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियमानुसार कार्यवाही करण्याची शिफारस विभागीय कृषि सहसंचालक, लातूर विभाग, लातूर यांनी कृषि आयुक्त, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविले आहे.

सदर प्रकरणी खालील अधिकारी/कर्मचारी जबाबदार आहेत.—

१) श्री. डी. आर. जाधव, तत्कालीन तालुका कृषि अधिकारी, उस्मानाबाद

२) श्री. डी. व्ही. जाधव, उप विभागीय कृषि अधिकारी

३) श्री. एस. पी. जाधव, तालुका कृषि अधिकारी, उस्मानाबाद

४) श्री. एम. एम. तोटावार, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, उस्मानाबाद

५) श्री. बी. आर. पाटील, कृषि सहायक, जिल्हा फळरोप वाटिका, ढोकी

६) श्री. जी. एन. सालेवार, कृषि पर्यवेक्षक जिल्हा फळरोप वाटिका, ढोकी

या सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांवर दोषारोप बजावण्याची कार्यवाही करण्यासाठी जिल्हा विभागीय कृषि सहसंचालक, लातूर यांचेकडून विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे दिनांक २२ जानेवारी, २०१८ रोजी प्रस्ताव पाठविला आहे.

अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कारवाई संदर्भात दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी घेण्यात आलेल्या साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, उस्मानाबाद जिल्ह्यातील ढोकी येथील रोपवाटीकेमधील ४ लाख तयार केलेल्या रोपांची निगा न राखल्याप्रकरणी व कामाच्या ठिकाणी निष्काळजीपणा केल्याबद्दल संबधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आली आहे त्यासंदर्भात सचिवांनी विदित केले की, यासंदर्भात संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर दोषारोपपत्र बजावले होते. या पुढील कार्यवाहीबाबतची माहिती समितीस सादर करण्यात येईल. कृषि विभागाने रोपवाटिका तयार करण्याचे काम घेतले होते. परंतु ते काम विहित कालावधीत पूर्ण केलेले नाही. त्यावर समितीने पृच्छा केली की, रोपवाटिका किती होत्या, त्यावर किती खर्च झालेला होता, सदर रोपवाटिका किती महिन्यांसाठीची होती, संबंधित विभागावर दोषारोप काय ठेवले आहेत, सदर दोषारोप कर्मचाऱ्यावर ठेवण्यात आले आहेत की, अधिकाऱ्यांवर आणि त्यापुढील काय कार्यवाही झाली. त्यावर सचिवांनी सांगितले की, या संदर्भातील सर्व माहिती समितीस उपलब्ध करून देण्यात येईल. तालुका कृषि अधिकाऱ्यापासून खालच्या स्तरापर्यंतच्या अधिकाऱ्यावर दोषारोप ठेवण्यात आलेले आहेत. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकाऱ्यावर देखील दोषारोप ठेवण्यात आलेले आहेत. विभागाची भूमिका याबाबत वेगळी आहे. प्रत्येक गोष्टीसाठी गटविकास अधिकारी, तहसिलदार अशा अधिकाऱ्यांना जबाबदार धरले तर योजनेतील कामाबाबत नकारात्मक भावना निर्माण होते. यामध्ये जो कोणी दोषी आहे त्यावरच कारवाई केली तर योग्य ठरेल तथापि, कृषि पर्यवेक्षक, कृषि सहाय्यक, तालुका कृषि अधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी या सर्व अधिकाऱ्यावर दोषारोप ठेवण्यात आले आहेत.

उपरोक्त प्रकरणी सचिव, नियोजन (रोहयो) विभाग यांनी अधिकची माहिती देताना सांगितले की, यामध्ये रोप वाटिका निरीक्षकाची मोठ्या प्रमाणावर चूक आहे. त्यामुळे ज्या अधिकाऱ्याने जाणूनबूजून चूक केली असेल तर अशा अधिकाऱ्यांवर कारवाई होणे आवश्यक आहे. त्यावेळी १०० कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबविण्यात आला होता. यातील काही रोप वाटिका ग्रामपंचायतीने तयार केल्या, तर काही सामाजिक वनीकरण विभागाने आणि काही कृषि विभागाने तयार केल्या होत्या. कृषि विभागाने रोप वाटिका या शेताच्या बांधावर जाऊन तयार केलेल्या आहेत. दोषारोप ठेवण्यात आलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्याचे नावे विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना पाठविण्यात आले आहेत. त्यासंदर्भात सचिवांनी असे ही सांगितले की, निष्काळजीपणे काम करणे व इतर काही दोषारोप ठेवण्यात आले आहे. रोजगार हमी योजनाअंतर्गत १०० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत फळ झाडांची रोपे तयार करण्याचा कार्यक्रम राबविला होता. समितीच्या भेटीच्या वेळी सदर रोपे जळून गेल्याचे दिसून आले आहे. या संदर्भात संबधितांवर दोषारोप ठेवण्यात आले आहेत. यातील चौकशी अंती योग्य ती कारवाई करण्यात येईल. यावर समितीने निर्देश दिले की, संबंधित अधिकाऱ्यांने केलेल्या निष्काळजीपणाबाबत विभागाने काय कारवाई केली आहे. तसेच सदर कार्यवाहीस विलंब होण्याची कारणे काय आहेत, या संदर्भातील माहिती समितीस द्यावी तसेच संबधित अधिकाऱ्यांने दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करण्यास जाणूनबूजून वेळ लावला असेल तर त्या अधिकाऱ्यावर देखील योग्य ती कारवाई करण्यात यावी. तसेच यासंदर्भात दिनांक १५ मे, २०१८ रोजीच्या बैठकीत चर्चा होताना उपरोक्त प्रकरणातील अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंदर्भात समितीने पुन्हा निर्देश दिले.

**अभिप्राय व शिफारशी :**

उस्मानाबाद तालुक्यातील ढोकी येथील रोपवाटीकामधील ४ लाख रोपे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या निष्काळजीपणामुळे जळून गेल्याचे समितीच्या निदर्शनास आले होते. याप्रकरणी संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आली, अशी समितीने साक्षीच्या वेळी विचारणा केली असता सचिवांनी सांगितले की, तहसीलदार, उस्मानाबाद यांनी केलेल्या चौकशी अहवालात तत्कालीन तालुका कृषि अधिकारी, उप विभागीय कृषि अधिकारी व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी दुर्लक्ष केल्याचे आढळून आले आहे. यासंदर्भात संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर दोषारोपपत्र बजावण्याची कार्यवाही करण्यासाठी जिल्हा विभागीय कृषि सहसंचालक, लातूर यांच्याकडून दिनांक २२ जानेवारी, २०१८ रोजी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

**उस्मानाबाद तालुक्यातील ढोकी येथील रोपवाटीका मधील ४ लाख रोपे जळून गेल्यामुळे गेल्यामुळे संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावयाची शिफारस सन २०१५-१६ च्या समितीच्या चौथ्या अहवालात केली होती त्याअनुषंगाने उपरोक्त प्रकरणी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची तातडीने चौकशी करून त्यांच्यावर करण्यात आलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**(सहा) फलोत्पादन**

(१) जिल्ह्यात फळबाग योजना वाढीसाठी कोणकोणते प्रयत्न करण्यात आले आहेत, असे समितीने विचारले असता समितीला सांगण्यात आले की, फळबाग व फळझाडे लावण्यासाठी रोजगार हमीमध्ये लक्षांक दिलेला आहे. तथापि, राष्ट्रीय रोजगार हमी योजनेमध्ये लक्षांकांची अट नाही. जिल्ह्यात ३६ हेक्टरवर फळझाडांची लागवड होणे फार नगण्य असून जिल्ह्यातील लोकसंख्येचा विचार करता कृषिवर आधारित फळझाड लागवडीची भरीव योजना अंमलात आणण्यात यावी, अशी शिफारस समितीने केली होती.

उपरोक्त शिफारशींच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीत असे नमूद केले आहे की, चालू वर्षी रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवडीसाठी लक्षांक नाही. रोजगार हमी योजनेअंतर्गत वर्ष निहाय झालेली फळबाग लागवडीचे उद्दिष्ट व साध्य खालीलप्रमाणे आहे :—

| अ.क्र.<br>(१) | वर्ष<br>(२) | उद्दिष्ट (हे.)<br>(३) | साध्य (हे.)<br>(४) |
|---|---|---|---|
| १ | २०१५-२०१६ | १५४.४७ | १५४.४७ |
| २ | २०१६-२०१७ | १०६.०० | ८९.५० |
| ३ | २०१७-२०१८ | ०० | २३३.३८ |

सदरील योजनेची प्रसिद्धी कृषि विभागामार्फत करण्यात येऊन अर्ज मागविण्यात येत आहेत व निवड केलेल्या पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात येत आहे. समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजनेअंतर्गत राज्यात फळझाड लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

(१) रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून फळबाग लागवडीसाठी कृषि विभागास निधी दिला जातो व त्यांच्याकडून फळबाग योजनेसाठी अनुदान देण्यात येऊन दरवर्षी फळबाग लागवडीसाठी लक्षांक देण्यात येतो. तथापि, जिल्ह्यामध्ये मागील चार वर्षांत असलेल्या दुष्काळामुळे नवीन फळबागांची जास्त प्रमाणात लागवड झालेली नाही. त्यामुळे भविष्यकाळात जिल्ह्यामध्ये फळबागांची संख्या वाढविण्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. शासनाच्या निधीवर अवलंबून न राहता लोकसहभागातून वृक्ष लागवड योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी तसेच वैयक्तिक लाभाच्या योजनांची माहिती लाभार्थ्यांना द्यावीत त्याचप्रमाणे दुष्काळ किंवा गारपिटीमध्ये फळबागांचे नुकसान झाल्यास रोजगार हमी योजनेतून लाभार्थ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी, अशी समितीने शिफारस केली होती.

उपरोक्त शिफारशींच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीत असे नमूद केले आहे की, जिल्ह्यात फळबागेचे क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने शासनाच्या योजनेच्या व्यतिरिक्त लोकसहभागातून वृक्ष लागवड केलेली आहे. तसेच विविध योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजना जसे शेततळे, कांदाचाळ, शेततळे अस्तरीकरण, यांत्रिकीकरण इत्यादी योजना राबविण्यात येत आहे. वैयक्तिक लाभाच्या योजनांची माहिती शेतकऱ्यांना क्षेत्रीयस्तरावरून कृषि सहायक, कृषि पर्यवेक्षक व मंडळ कृषि अधिकारी यांचे मार्फत दिली जाते. दुष्काळ व गारपिटीमध्ये फळबागेचे नुकसान झाल्यास सर्वेक्षणाद्वारे शासनामार्फत राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन अथवा राज्य शासनामार्फत मदत दिली जाते. दुष्काळ किंवा गारपिटीमध्ये फळबागाचे नुकसान झाल्यास रोजगार हमी योजनेतून लाभार्थ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कार्यवाही करण्यासाठी संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, पुणे यांना दिनांक २८ सप्टेंबर, २०१७ अन्वये कळविले आहे. समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजनेअंतर्गत उस्मानाबाद जिल्ह्याला सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या वर्षाकरिता २७०० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

अहवालातील शिफारशीवर शासनाने केलेल्या कारवाई संदर्भात दिनांक ७ फेब्रुवारी २०१८ रोजी घेण्यात आलेल्या साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, जिल्ह्यामध्ये कृषिवर आधारित फळबाग लागवडीची भरीव योजना अंमलबजावणीकरिता कोणकोणते प्रयत्न करण्यात आलेले आहेत? तसेच लोकसहभागातून वृक्षलागवड योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी व वैयक्तिक लाभांच्या योजनांची माहिती लाभार्थ्यांना देण्यात आली आहे का? तसेच दुष्काळ किंवा गारपिटीमध्ये फळबागांचे नुकसान झालेल्या लोकांना आर्थिक मदत देण्यात आली आहे काय, त्यासंदर्भात सचिव, (रोहयो) यांनी प्रतिपादन केले की, लोकसहभाग किंवा फळबाग लागवड योजनेअंतर्गत समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजनेतर्गत उस्मानाबाद जिल्ह्याला सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ दोन वर्षांसाठी २७०० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. नॅशनल डिझास्टर रिलीफ फंडातून (एनडीआरएफ) आपण नुकसानभरपाई देतो. खरीप व बागायतीसाठी त्याचे निकष ठरले आहेत. त्याप्रमाणे निधी उपलब्ध करून दिला जातो. साक्षीच्या वेळी उस्मानाबाद जिल्हा अधीक्षक, कृषि अधिकारी यांनी माहिती दिली की, उस्मानाबाद जिल्ह्यात अत्यंत कमी म्हणजे ३६ हेक्टरवर फळबाग लागवड होती. महाराष्ट्र जनकल्याण योजनेमध्ये सन २०१६-२०१७ पासून फळबाग लागवड योजनेला सुरूवात केली आहे. सन २०१६-२०१७ या वर्षात रोजगार हमी योजनेंतर्गत ८९.५० हेक्टर लागवड झाली होती, चालू वर्षात २३३ हेक्टरवर लागवड झाली आहे, गावपातळीवर योग्य लाभार्थ्यांची निवड केली जाते व लागवड वाढविण्यावर भर दिला जात आहे. सन २०१७-२०१८ मध्ये रोजगार हमी योजनेमध्ये लक्षांक नव्हता, मात्र मग्रारोहयोमध्ये लक्षांक दाखविण्यात आलेला आहे. यासंदर्भात समितीने आणखी विचारणा केली की, याबाबतची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचते का ? त्यावर जिल्हा कृषि अधिकारी यांनी सांगितले की, यामध्ये अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचा जास्त सहभाग असून यामध्ये मोठे शेतकरी नाहीत. मोठ्या शेतकऱ्यांचा समावेश नसल्यामुळे फळबाग लागवड कमी प्रमाणात होते.

**अभिप्राय व शिफारशी :**

रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून फळबाग लागवडीसाठी देण्यात आलेल्या निधीमधून मोठ्या प्रमाणात फळबाग लागवड होणे आवश्यक होते. तथापि, सन २०११-१२ ते सन २०१६-१७ या कालावधीत उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये नवीन फळबागांची लागवड कमी प्रमाणात झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे लोकसहभागातून फळबाग व वृक्षलागवड योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे, अशी समितीने सूचना केली असता सचिवांनी साक्षीच्या वेळी सांगितले की, उस्मानाबाद जिल्ह्याला सन २०१६-१७ व २०१७-१८ या दोन वर्षांसाठी २७०० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. **त्यानुसार समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण योजनेअंतर्गत सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षामध्ये गावपातळीवर योग्य लाभार्थ्यांची निवड करण्यात येऊन फळबाग लागवड वाढविण्यावर भर देण्यात यावा. याप्रकरणी, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचा जास्तीत जास्त सहभाग घेऊन फळबाग लागवडीचे उद्दिष्ट गाठण्यात यावे व याबाबतची कार्यवाही समितीला तीन महिन्यात कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

दुष्काळ किंवा गारपिटीमुळे फळबागांचे नुकसान झाल्यास त्यांना आर्थिक मदत देण्याबाबत समितीने सन २०१५-१६ च्या चौथ्या अहवालात केलेल्या शिफारशीवर केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली, असे समितीने साक्षीच्या वेळी विचारले असता सचिवांनी सांगितले की, फळबागांचे नुकसान झाल्यास राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीमधून तसेच राज्य शासनामार्फत नुकसानभरपाई देण्यात येते. **दुष्काळ किंवा गारपिटीमुळे फळबागांचे नुकसान झालेला कोणताही शेतकरी आर्थिक मदतीपासून वंचित राहणार नाही याबाबत नियोजन (रोहयो) विभागाने दक्षता घ्यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

**(सात) जवाहर विहीर कार्यक्रम :-**

समितीने बैठकीच्या वेळी जिल्ह्यातील विहीरीबाबत माहिती विचारली असता समितीला सांगण्यात आले की, मनरेगा अंतर्गत योजना सुरू झाल्यापासून ९ हजार २६४ विहीरी मंजूर आहेत. त्यापैकी ७ हजार ३७ विहीरी पूर्ण झालेल्या आहेत आणि १७०७ विहीरींचे काम सुरू आहे, तसेच ९९ जवाहर विहीरी अपूर्ण होत्या, त्यापैकी रोजगार हमी योजनेतून २६ विहीरी पूर्ण करावयाच्या होत्या. जवाहर विहीरीपैकी २१ विहीरी पूर्ण झालेल्या आहेत व ५ विहीरी अपूर्ण आहेत. उर्वरित ७३ विहीरी पैकी, ६ विहीर पूर्ण व १ प्रस्तावित विहीर शेतकऱ्यांने जमीन विकल्यामुळे रद्द झाली. एकूण ६६ विहीरी मनरेगाकडे वर्ग करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये २० विहीरी शेतकऱ्यांनी सुरू केल्या नाहीत व १० विहीरी पूर्ण झालेल्या आहेत. २ शेतकरी मयत झालेले व जमीन विकलेले आहे. तसेच ६ लाभार्थ्यांनी आर्थिक अडचण असल्यामुळे विहीरी करण्यास नकार दिला. तथापि, समितीला दौऱ्याच्या वेळी निदर्शनास आले की, लाभार्थ्यांना विहीरीच्या अनुदानाचे पैसे मिळण्यास बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागते तर काही लाभार्थ्यांना विहीरीचे पैसे मिळतच नाही. त्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांच्या विहीरीचे कामे अर्धवट अवस्थेत आहेत. याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्ती केली.

उस्मानाबाद जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे शेतकरी विहीरीच्या कामासाठी आपल्याकडील बचतीचे पैसे खर्च करतो तर कधी कर्ज काढून विहीरीचे काम पूर्ण करतो, परंतु विहीरीच्या कामावर असलेल्या मजुरांचे पैसे त्याला शासनाकडून मिळत नाही. या कारणांमुळे तो अडचणीत येऊन पुन्हा कर्ज काढतो व कर्जाच्या दुष्ट चक्रामध्ये सापडतो. याबाबत संबधित यंत्रणांनी योग्य नियोजन व योग्य वेळी निधीची मागणी न केल्यामुळे विहीरीची कामे पूर्ण होऊ शकली नाही. तसेच लाभार्थ्यांना मजुरीचे पैसे मिळालेले नाहीत. जास्तीत जास्त शेतकऱ्यांना विहीरींचा लाभ मिळण्यासाठी प्रोत्साहित करण्यात यावे व आवश्यक तेवढा निधी शासनाने उपलब्ध करून देण्यात येऊन शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये ७ दिवसांत पैसे जमा होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात याव्यात व अपूर्ण असलेल्या विहीरी पूर्ण करण्याच्या दृष्टीने कालबद्ध कार्यक्रम आखण्यात यावा अशी शिफारस समितीने केली होती.

उपरोक्त शिफारशींच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीत असे नमूद केले आहे की, जिल्ह्यात सन २०१४-२०१५ व २०१५-२०१६ मध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये वैयक्तिक लाभाची सिंचन विहीरीची कामे मागणी प्रमाणे सुरू करण्यात आली. सिंचन विहीरींच्या सुरू झालेल्या कामावर उपस्थित असलेल्या मजुरांची मजुरी वितरीत करताना विलंब झालेला आहे. हा विलंब टाळण्यासाठी शासन परिपत्रक दिनांक ०६ एप्रिल, २०१५ अन्वये मजुरी विलंबाने वितरीत करण्यात जबाबदार संबंधित कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. यामुळे मजुरांची मजुरी वेळेत अदा करण्यामध्ये सुधारणा झाली आहे.

| अ.क्र. | तपशील | विहीरींची संख्या | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | ८१% पेक्षा जास्त खर्च झालेल्या विहीरी | १५५ | जानेवारी २०१८ पर्यंत |
| २ | ६१ ते ८० पर्यंत खर्च झालेल्या विहीरी | २४९ | फेब्रुवारी २०१८ पर्यंत |
| ३ | ४१ ते ६० पर्यंत खर्च झालेल्या विहीरी | २६० | मार्च २०१८ पर्यंत |
| ४ | ०१ ते ४० पर्यंत खर्च झालेल्या विहीरी | ६४९ | मे २०१८ पर्यंत |
| ५ | निरंक खर्च | १२४ | लाभार्थ्यांची भेट घेऊन कामे पूर्ण करावीत अथवा कामे रद्द करण्यात येतील असे सांगण्यात येईल. |
| | **एकूण** | **१४३७** | |

माहे जानेवारी, २०१८ मध्ये जिल्ह्यात वेळेवर मजुरी वाटपाचे प्रमाण ७०.७४ टक्के आहे. जिल्ह्यात नरेगाअंतर्गत २७५ इतक्या विहीरी पूर्ण झाल्या असून १३१५ विहीरींचे कामे प्रगतीपथावर आहेत. पूर्ण झालेल्या विहीरीच्या कामावर रुपये १९२.०६ लक्ष इतका खर्च झाला आहे. तर प्रगतीपथावरील विहीरीवर रुपये १२५.९८ लक्ष इतका खर्च झाला आहे.

अहवालातील शिफारशीवर शासनाने केलेल्या कारवाई संदर्भात दिनांक ७ फेब्रुवारी २०१८ रोजी घेण्यात आलेल्या साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, जिल्ह्यातील अपूर्ण विहीरीसाठी शासनाकडून किती निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे व त्यानुंषगाने अपूर्ण विहीर पूर्ण करण्याच्या दृष्टीने आखण्यात आलेल्या कालबद्ध कार्यक्रमाची माहिती समितीला देण्यात यावी, त्यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

उस्मानाबाद यांनी विदित केले की, आतापर्यंत ८९०० विहीरी जिल्ह्यामध्ये मंजूर करण्यात आल्या होत्या, ७६६६ विहीरी सुरूवातीपासून आतापर्यंत पूर्ण करण्यात आलेल्या आहेत. १४४७ विहीरी अपूर्ण आहेत. टप्पानिहाय झालेल्या खर्चाचे वर्गीकरण केले आहे. राज्य शासनाकडून पहिल्या टप्प्यात ४५ लक्ष, दुसऱ्या टप्प्यात २१.९० लक्ष असे अनुदान कुशल घटकासाठीप्राप्त झाले आहे. प्राधान्याने ७५ टक्केपेक्षा जास्त पूर्ण असलेल्या विहीरींचे कुशल प्रदान पूर्ण करून या विहीरींचे काम पूर्ण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्यावर समितीने पृच्छा केली की, विहीरी खोल करण्याकरिता ५०-६० फुट अशी मर्यादा घातली का तसेच ५० फुटापर्यंत पाणी लागले नाही तर त्या शेतकऱ्याचा काय फायदा आहे. विहीर मोठ्या प्रमाणात खोदूनही पाणी मिळत नसेल तर शेतकरी त्रस्त होतो. यासाठी काय तरतुदी आहे. त्यासंदर्भात सचिवांनी सांगितले की, विहीर खोल करण्याकरिता ५०-६० फूट मर्यादेसंदर्भात खर्चाच्या अंदाजपत्रकात तसे नमूद केलेले असते तसेच पाण्याची पातळी दिवसेंदिवस खाली जात आहे, तज्ज्ञांचा सल्ला घेऊन जेथे पाणी मिळेल अशा ठिकाणी विहीर घेणे अपेक्षित आहे. बाजूला बोअर असेल तर १०० फूट खाली गेले तरी पाणी लागणार नाही. भूजलसर्वेक्षण यंत्रणेने नकारात्मक दाखला दिला असेल तर तेथे विहीर घेण्यात काही अर्थ नाही.

**अभिप्राय व शिफारशी :-**

उस्मानाबाद जिल्ह्यातील अपूर्ण विहीरी पूर्ण करण्यासाठी किती निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे व अपूर्ण विहीरी पूर्ण करण्यासाठी काय उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत असे समितीने साक्षीच्या वेळी विचारले असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी समितीला सांगितले की, मंजूर करण्यात आलेल्या ९१२५ विहीरीमधून ७६८८ विहीरी पूर्ण करण्यात आलेल्या आहेत, १४३७ विहीरी अपूर्ण आहेत. त्यासाठी पहिल्या टप्प्यात ४५ लक्ष, दुसऱ्या टप्प्यात २१.९० लक्ष असे अनुदान घटकासाठीप्राप्त झालेले असून ७५ टक्के पेक्षा जास्त काम पूर्ण झालेल्या विहीरीचे कुशल प्रदान पूर्ण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तथापि, सद्य:स्थितीत सिंचन विहीरीची एकूण सुरू असलेली कामे १०७५७, एकूण पूर्ण कामे ८४९९ व एकूण अपूर्ण कामे २२५८ असल्याचे या सचिवालयास प्राप्त झालेल्या माहितीवरून दिसून येते.

**उपरोक्त प्रकरणी समितीने निदर्शनास आणले की, विहीरीची खोली वाढविण्यासंदर्भात ५०-६० फुटापर्यंत मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. सदरहू विहीरीच्या बाजूला जर बोअर असेल तर १०० फूटापर्यंतही पाणी लागत नाही. याप्रकरणी विहीरीची खोली निश्चित करताना भूजल सर्वेक्षण यंत्रणेने तंज्ज्ञाचा सल्ला घेऊन व दुष्काळामुळे पाण्याची पातळी खाली गेल्याची बाब लक्षात घेऊन शेतकऱ्यांना कोणत्या ठिकाणी विहीर घेणे सोईस्कर होईल याबाबत प्रयत्न करावेत व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट - अ

**(विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती.)**

## विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती.

❖अहवालातील " मजुरीची वाटप " ह्या शिफारशी मधील मुद्या क्रंमाक १ च्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीत असे नमूद केले आहे की, उप आयुक्त (रोहयो), औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र दिनांक १७ जानेवारी, २०१८ अन्वये विशेष कार्य अधिकारी, रोहयो-२, नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई यांना श्रीमती वैशाली पाटील तत्कालीन तहसीलदार, कळंब यांच्या विभागीय चौकशी प्रकरणाबाबत एकूण दोन संचिका चालू आहेत. त्यापैकी, तहसीलदार

संचिका ०१ :- श्रीमती वैशाली पाटील, तहसीलदार, कळंब यांचे विरुद्ध विभागीय चौकशी करणे करीता जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचा प्रस्ताव दिनांक २ जुलै, २०१५ अन्वये नियोजन विभागास सादर केल्यानुसार त्यांना नियम ८ अन्वये ज्ञापनपत्र ०१ ते ०४ सह देऊन त्यांचे अभिवेदन मागविण्यात आले. प्रकरणात अपचारी अधिकारी यांना या कार्यालयाचे आदेश दिनांक १३ जुलै, २०१५ अन्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात येवून जिल्हाधिकारी, उस्मानाबाद हे मुख्यालय ठेवण्यात आले. निलंबनाचे नाराजीने त्यांनी मा.मंत्री (महसूल) यांचेकडे अपिल क्र १५४५/२०१५ दाखल केले. शासन आदेश क्र. पुनस्था २५२५/प्र.क्र.३९८/ई-४, दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५ अन्वये श्रीमती पाटील यांना चौकशीच्या अधीन राहून सेवेत पुनःस्थापित केले आहे.

सदरहू प्रकरणात दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ अन्वये प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. चौकशी अधिकारी यांनी चौकशी अंती त्यांचे निष्कर्षासह चौकशी अहवाल दिनांक २७ जानेवारी, २०१७ नुसार दिलेला आहे. विभागीय आयुक्त यांचे स्तरावर श्रीमती वैशाली पाटील यांना अंतिम कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांचे अंतिम अभिवेदन मागविणेकरिता संचिका सादर करण्यात आली आहे. आणि,

संचिका ०२ :- श्रीमती वैशाली पाटील यांचे दुसरे प्रकरण विधानमंडळ रोहयो समिती जिल्हा बैठक दिनांक २५, २६ व २७ जून, २०१५ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत तत्कालिन तहसीलदार, परांडा असताना त्यांनी कुशल देयकाचे धनादेश यंत्रणे ऐवजी गुत्तेदारांना देणे, रोख पुस्तिकेनुसार धनादेश न देता कमी अधिक रक्कमेचे धनादेश देणे अशा व इतर दोषारोपाबाबत दिनांक १२ ऑक्टोबर, २०१५ अन्वये ०१ ते ०४ दोषारोप पत्र इतर पुराव्याच्या कागदपत्रासह प्रस्ताव दाखल केला. त्यानुसार त्यांना नियम ०८ अन्वये, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ नुसार ज्ञापनपत्र देण्यात आले.

सदर प्रकरणात विभागीय आयुक्त यांचे आदेश दिनांक १८ एप्रिल, २०१६ अन्वये प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांची नियुक्ती अधिकारी म्हणून करण्यात आली. प्रकरणात सद्य स्थितीत प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी यांच्याकडे चौकशी चालू आहे.

विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्यामार्फत चौकशी सुरू असून विभागीय चौकशी तातडीने पूर्ण करण्याबाबत कळविले आहे.

दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने समितीला महसूल व वन (महसूल) विभागाच्या अधिकाऱ्यांनी आश्वासित केल्यानुसार समितीने उपस्थित केलेल्या मुद्यांची पुढीलप्रमाणे माहिती दिली.

● श्रीमती वैशाली पाटील या सद्यस्थितीत तहसीलदार,सेनगांव, जि. हिंगोली या कार्यकारी पदावर कार्यरत असून, रोजगार हमी योजना समितीने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने श्रीमती वैशाली पाटील यांना औरंगाबाद विभागात अकार्यकारी पदावर पदस्थापना देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.

● श्रीमती वैशाली पाटील, तत्का. तहसीलदार कळंब, जि. उस्मानाबाद यांच्या मालमत्तेची उघड चौकशीच्या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची सविस्तर माहिती/घटनाक्रम आवश्यक त्या कागदपत्रांसह विधानमंडळ रोजगार हमी योजना समितीच्या बैठकीमध्ये सादर करण्यासाठी उपलब्ध करून देण्याबाबत महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांना कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने महासंचालक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या पत्रान्वये श्रीमती वैशाली पाटील तत्का. तहसीलदार कळंब, जि.उस्मानाबाद यांच्या मालमत्तेची उघड चौकशीच्या प्रकरणामध्ये करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची गोपनीय माहिती समितीला सादर करण्यात आली.

दिनांक १५ मे, २० जून, २०१८ रोजीच्या बैठकीत श्रीमती वैशाली पाटील, तत्कालीन तहसीलदार, ता.कळंब/ता.परांडा, जि.उस्मानाबाद यांच्याविरुद्धच्या विभागाची चौकशीबाबत चर्चा करण्यात आली. त्या अनुषगाने नियोजन (रोहयो) विभाग यांच्याकडून खालीलप्रमाणे माहिती दिली.

● श्रीमती वैशाली पाटील, तत्कालीन तहसीलदार, तालुका कळंब आणि परांडा, जिल्हा उस्मानाबाद यांनी रोहयोच्या कामामध्ये केलेल्या अनियमितता आणि अपहाराच्या संदर्भात दोन प्रकरणाच्या अनुषंगाने विभागीय चौकशी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी पूर्ण करून चौकशी अहवाल मूळ कागदपत्रासह शासनाकडे दिनांक १२ मार्च, २०१८ रोजी सादर केल्यानंतर त्यावर शासन स्तरावर अंतिम कार्यवाही सुरू करण्यात आली होती.

● समितीने दिलेल्या निदेशानुसार जिल्हाधिकारी,उस्मानाबाद यांनी श्रीमती वैशाली पाटील यांची चौकशी करून प्राथमिक अहवाल दिनांक ४ ऑगस्ट, २०१८ रोजी शासनाकडे सादर केला. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी तत्कालिन तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांच्याविरुद्ध दिनांक १७ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या ज्ञापनाद्वारे दोषारोप बजावून तिसरी विभागीय चौकशी सुरू केलेली आहे.

● श्रीमती वैशाली पाटील यांच्याविरुद्ध मग्रारोहयो/रोहयो अंतर्गत दोन प्रकरणातील अनियमितता व गैरव्यवहाराबाबत विभागीय चौकशी पूर्ण करून दोन प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले असले तरी रोहयो समितीच्या उस्मानाबाद जिल्ह्याच्या दौऱ्याच्या अनुषंगाने वर्ष २०१५-२०१६ च्या चौथ्या अहवालात व्यक्त केलेले अभिप्राय व शिफारशीच्या अनुषंगाने तिसऱ्या घटनेची चौकशी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे सुरू आहे. सदर चौकशी तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांना देण्यात येत आहेत. यापूर्वी सुरू असलेल्या चौकश्या व सद्य स्थितीत सुरू असलेली तिसरी चौकशी या तिनही चौकशीमधील दोषारोपांचे साम्य लक्षात घेता, तिसऱ्या घटनेतील अनियमितता आणि अपहाराचा चौकशी अहवाल प्राप्त होताच श्रीमती वैशाली पाटील यांच्या संदर्भातील उपरोक्त तिनही घटनांच्या अनुषंगाने शिक्षेबाबत एकत्रित अंतिम निर्णय घेण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येईल.

❖ अहवालातील “ मजुरीची वाटप ” ह्या शिफारशी मधील मुद्दा क्रमांक २ च्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीत असे नमूद केले आहे की, सदर प्रकरण कळंब तालुक्यातील असून पोलीस स्टेशन, कळंब येथे पहिली खबर क्र.३३/१५ दि. १७ मार्च, २०१५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. खाली नमूद गुन्ह्यात समाविष्ट अधिकारी/कर्मचारी यांचे विरुद्ध आय.पी.सी. अंतर्गत कलम ४२०, ४६८, ४७१, ४७१-अ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(१) श्री. डि. एच. राठोड, तत्कालीन तहसीलदार, कळंब.

(२) श्री. डि. एम. शिंदे, तत्कालीन नायब तहसीलदार, कळंब.

(३) श्री. एन. डी. पवार, अव्वल कारकून, तहसील, कळंब.

(४) श्री. एस. यु. पठाण, लिपीक, तहसील, कळंब.

(५) श्री. पी. बी. घुमरे, उप अभियंता, पाटबंधारे उप विभाग, भूम मुख्यालय, कळंब.

(६) श्री. एस. के. फड, शाखा अभियंता, पाटबंधारे उप विभाग, भूम मुख्यालय, कळंब.

(७) श्री. गणेश शिवाजी फत्तेपुरे, कंत्राटी लेखापाल, तहसील, कळंब.

सदरहू प्रकरणातील सात कर्मचाऱ्यांपैकी सहा कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली होती व त्यांची मा. न्यायालयाने जामिनावर मुक्तता केली आहे. या कार्यालयाचे पत्र दिनांक ११ मे, २०१६ अन्वये विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना चार अधिकारी/कर्मचारी यांचे दोषरोपपत्र ०१ ते ०४ सादर केले आहे. तसेच विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडून या चार कर्मचाऱ्यांविरुद्ध तामिल करण्यासाठी प्राप्त झालेले ज्ञापनपत्र बजावणीसाठी तहसीलदार, कळंब यांचेकडे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी पाठविले आहे. त्यानुसार तहसीलदार, कळंब यांचे स्तरावर तामिलीची कारवाई सुरू आहे.

**दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या विभागीय सचिवांच्या साक्षीकरिता विभागाकडून प्राप्त झालेली माहिती**

**(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा तालुक्याच्या तत्कालीन तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांची सहा महिन्याच्या आत विभागीय चौकशी पूर्ण न करण्याचे कारणे काय आहेत.**

श्रीमती वैशाली पाटील यांच्याविरुद्ध एकूण तीन विभागीय चौकश्या सुरू करण्यात आल्या असून त्यांचा तपशील खालीलप्रमाणे —

(अ) **कळंब येथील विभागीय चौकशीचे प्रकरण.—**श्रीमती वैशाली पाटील यांच्याविरुद्ध दोषारोप बजावून दिनांक १३ जुलै, २०१५ रोजी विभागीय चौकशी सुरू करण्यात आली. दोषारोपाच्या अनुषंगाने सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्याने सखोल चौकशी करणे आवश्यक असल्याने विभागीय आयुक्तांनी चौकशी अधिकारी/सादरकर्ता अधिकारी यांची नेमणूक केली. विभागीय चौकशी अधिकाऱ्यांनी चौकशी पूर्ण करून चौकशी अहवाल शासनास दिनांक जानेवारी, २०१८ रोजी सादर केला.

(ब) **परांडा येथील विभागीय चौकशीचे प्रकरण.—**श्रीमती वैशाली पाटील यांच्याविरुद्ध दोषारोप बजावून दिनांक १९ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय चौकशी सुरू करण्यात आली. दोषारोपाच्या अनुषंगाने सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्याने सखोल चौकशी करणे आवश्यक असल्याने विभागीय आयुक्तांनी चौकशी अधिकारी/सादरकर्ता अधिकारी यांची नेमणूक केली. विभागीय चौकशी अधिकाऱ्यांनी चौकशी पूर्ण करून चौकशी अहवाल शासनास दिनांक मार्च, २०१८ रोजी सादर केला.

(क) **परांडा येथील विभागीय चौकशीमध्ये अतिरिक्त दोषारोप बजाविण्यात आले त्याबाबतची विभागीय चौकशी.—** सदर तिसऱ्या विभागीय चौकशी प्रकरणी श्रीमती वैशाली पाटील यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन परांडा येथे भा.दं.वि.च्या कलम ४०६ व ४०९ खाली दिनांक २ जानेवारी, २०१९ रोजी गुन्हा क्र.१/२०१९ दाखल करण्यात आला असून त्याबाबत पोलीस तपास सुरू आहे. पोलीस तपासानंतर प्रकरण न्यायालयात दाखल होणार असल्याने विभागीय चौकशी नियमपुस्तिका १९९१ मधील प्रकरण ४ मधील परिच्छेद क्र.४.२ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनी विभागीय कारवाई सुरू करण्यापूर्वी खटला दाखल करणे व निर्णयाची प्रतिक्षा करणे उचित ठरेल.

त्यानुसार याप्रकरणी पोलीस तपास झाल्यानंतर किती रकमेचा अपहार झाला हे तपासाअंती अधिक स्पष्ट होईल. तसेच पोलीस उप-अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो यांच्याकडेसुद्धा चौकशी चालू असल्याचे विभागीय आयुक्तांनी कळविले आहे. म्हणून वरील परिस्थितीचा विचार करता या प्रकरणी न्यायालयीन निर्णय येईपर्यंत शिक्षेचा निर्णय रोखून ठेवण्यात आला आहे.

**विभागीय चौकशी प्रकरणी विलंब होण्यास मुख्यतः खालील कारणे आहेत—**

विभागीय चौकशी प्रकरणी गैरव्यवहार झाला असल्यास शिस्तभंग विषयक प्राधिकारी प्राथमिक चौकशी करून विभागीय चौकशी करायची किंवा नाही याबाबत निर्णय घेतात. चौकशी करावयाची असल्यास चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे, दोषारोपपत्र बजावणे, बचावाचे अभिवेदन घेणे, चौकशीच्या प्रक्रीयेमध्ये त्यांची साक्ष घेणे, उलटतपासणी घेणे, अपचाऱ्याला बचावाची संधी देणे व चौकशीचे निष्कर्ष नोंदविणे याबाबी पार पाडाव्या लागतात. विभागीय चौकशी ही अर्धन्यायीक प्रक्रीया असल्याने सर्व नियम व कार्यपद्धती अवलंबविणे आवश्यक असते. तसेच चौकशी पूर्ण होऊन शासनस्तरावर प्रस्ताव प्राप्त झाल्यावर शिक्षेचा अंतिम निर्णय घेण्यापूर्वी संबंधित अपचाऱ्यांना बचावाची संधी देणे व सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने आयोगाची मान्यता घेणे इत्यादी प्रक्रीयेसाठी विभागीय चौकशी बाबतीत निर्णय होण्यास विलंब होतो.

या प्रकरणी श्रीमती पाटील यांची दोन चौकशी प्रकरणे शासनास प्राप्त झाली होती व रोहयो समितीच्या शिफारशीनुसार तिसरी विभागीय चौकशी प्रादेशिकस्तरावर प्रलंबित होती. दोन प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले असले तरी रोहयो समितीच्या उस्मानाबाद जिल्ह्याच्या दौऱ्याच्या अनुषंगाने वर्ष २०१५-१६ च्या चौथ्या अहवालात व्यक्त केलेले अभिप्राय व शिफारशीच्या अनुषंगाने तिसऱ्या घटनेची चौकशी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे प्रलंबित होती. सदर चौकशी तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांना देण्यात आल्या होत्या. त्यापूर्वी सुरू असलेल्या चौकश्या व सद्यःस्थितीत सुरू असलेली तिसरी चौकशी या तिनही चौकशीमधील दोषारोपांचे साम्य लक्षात घेता, तिसऱ्या घटनेतील अनियमितता आणि अपहाराचा चौकशी अहवाल प्राप्त होताच श्रीमती वैशाली पाटील यांच्या संदर्भातील उपरोक्त तिनही घटनांच्या अनुषंगाने शिक्षेबाबत एकत्रित अंतिम निर्णय घेण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येईल असे विभागाने रोहयो समितीला दिनांक १ जानेवारी, २०१९ च्या पत्रान्वये कळविले होते.

आता वरील दोन विभागीय चौकशी प्रकरणात प्रत्येकी ५ वर्ष वेतनवाढ कायमस्वरूपी रोखण्याची शिक्षा त्यांना प्रस्तावित करण्यात आली असून एका प्रकरणी रुपये १६,०९,८७९ इतकी वसुली त्यांच्या वेतनातून करण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्री यांच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला आहे. मा.मंत्री यांची मान्यताप्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सहमतीने अंतिम शिक्षेचे आदेश पारित करण्यात येतील.

**(२) श्रीमती वैशाली पाटील यांनी गैरव्यवहार व अपहार करूनही त्या कार्यकारी पदावर कार्यरत असण्याचे कारणे काय आहेत.**

सदर प्रकरणी श्रीमती वैशाली पाटील या तहसीलदार, माजलगाव, जि.बीड या कार्यकारी पदावर कार्यरत आहेत. निलंबनानंतर त्यांचे निलंबन संपुष्टात आणून महसूल विभागाने त्यांचे पुर्नस्थापनेचे आदेश काढले आहेत. सदर बाब नियोजन विभागाच्या रोहयो शाखेच्या अखत्यारित येत नाही.

**(३) श्रीमती वैशाली पाटील यांच्या प्रकरणात रिझर्व्ह फॉर ऑर्डरचा निकाल लागल्यानंतर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला देण्यात यावा.**

श्रीमती पाटील यांच्या तीन प्रकरणात विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली. विभागीय चौकशी पूर्ण होऊन अहवाल प्राप्त झाला असून अहवालाच्या अनुषंगाने शिक्षा देण्याची कार्यवाही शासनस्तरावर करण्यात येत आहे.

**(४) उपरोक्त प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी.**

पोलीस उप-अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद यांनी त्यांचे पत्र दिनांक १५ फेब्रुवारी, २०२१ अन्वये कळविल्यानुसार श्रीमती वैशाली पाटील यांचेविरुद्ध करण्यात आलेल्या उघड चौकशीचा अहवाल पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांचेमार्फत मा.महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर केला आहे.

**(५) श्रीमती वैशाली पाटील यांच्या संदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून नियोजन (रोहयो) विभागास प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यात यावी.**

अद्याप नियोजन विभाग (रोहयो) यांना अहवाल प्राप्त नाही.

# परिशिष्ट - ब

**(बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त)**

(शा.म.मु.) एचबी २५४५—५ (४५०—३-२०२२)

**पहिली बैठक**
**बुधवार, दिनांक २४ जानेवारी, २०१८**

समितीची बैठक बुधवार, दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी दुपारी १-०० वाजता विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

**उपस्थिती**

**समिती प्रमुख :**

(१) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.

**समिती सदस्य :**

(२) श्री. समीर कुणावार, वि.स.स.

(३) श्री. रमेश बुंदिले, वि.स.स.

(४) श्री. संजीवरेड्डी बोदकुरवार, वि.स.स.

(५) श्री. अनिल बाबर, वि.स.स.

(६) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

(७) श्री. त्र्यंबक भिसे, वि.स.स.

(८) डॉ. सतिश पाटील, वि.स.स.

(९) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

(१०) श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव

(२) श्री. बाळकृष्ण माने, अवर सचिव (समिती),

(३) श्री.मोहन काकड, कक्ष अधिकारी.

**मंत्रालयीन अधिकारी :**

(१) श्री. एकनाथ डवले, सचिव, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

(२) श्री. माणिक गुट्टे, सहसचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.

(३) श्री. प्रमोद शिंदे, उप सचिव, नियोजन (रोहयो) विभाग मंत्रालय, मुंबई.

(४) श्री. बा. कि. रासकर, उप सचिव, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

(५) श्रीमती ल. घ. वरखाडे, अवर सचिव, (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

(६) श्री. अ. ना. मदन, अवर सचिव, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. एस.आर. नायक, आयुक्त (मनरेगा), नागपूर.

(२) श्री. रा. वि. गमे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद.

(३) श्री. पुरुषोत्तम पाटोदकर, उपायुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

(४) श्री. रावसाहेब चव्हाण, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मग्रारोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

(५) श्री. संजय कुलकर्णी, उप.मु.का.अ. मग्रारोहयो, जि.प.औरंगाबाद.

(६) श्री. राजेंद्र खंदारे, उप जिल्हाधिकारी (रोहयो), उस्मानाबाद.

या बैठकीत समितीने चौथ्या अहवालातील (२०१५-१६) शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने नियोजन (रोहयो) विभागाकडून दिनांक २३ जानेवारी २०१८ रोजी प्राप्त झालेल्या माहिती संदर्भात सचिव, नियोजन (रोहयो) व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली (साक्ष अपूर्ण).

**दुसरी बैठक**

**बुधवार, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८**

समितीची बैठक बुधवार, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८ रोजी दुपारी १-०० वाजता विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते. :—

**समिती सदस्य :**

(१) श्री. रमेश बुंदिले, वि.स.स.

(२) श्री. अनिल बाबर, वि.स.स.

(३) श्री. त्र्यंबक भिसे, वि.स.स.

(४) डॉ. मधुसूदन केंद्रे, वि.स.स.

(५) श्री. सतिश पाटील, वि.स.स.

(६) श्री. विनायक मेटे, वि.प.स.

(७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(८) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

(९) श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

(१०) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स. (विशेष निमंत्रित)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव.

(२) श्री. बाळकृष्ण माने, अवर सचिव (समिती),

(३) श्री. मोहन काकड, कक्ष अधिकारी.

**मंत्रालयीन अधिकारी :—**

(१) श्री. एकनाथ डवले, सचिव, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

(२) श्री. माणिक गुट्टे, सह सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.

(३) श्री. प्रमोद शिंदे, उप सचिव, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

(४) श्री. बा. कि. रासकर, उप सचिव, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

(५) श्रीमती ल. घ. वरखाडे, अवर सचिव, (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

**विभागीय प्रतिनिधी :—**

(१) डॉ. संजय कोलते, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.उस्मानाबाद.

(२) श्री. पुरुषोत्तम पाटोदकर, उपायुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

(३) श्री. अनंत कुमार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

(४) श्री. राजेंद्र खंदारे, उप जिल्हाधिकारी (रोहयो), उस्मानाबाद.

---

● मा. समिती प्रमुख बैठकीत अनुपस्थित असल्यामुळे समितीच्या सदस्यांनी त्यांच्या जागी श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स. यांची कार्यकारी समिती प्रमुख म्हणून निवड केली व त्यांनी " कार्यकारी समिती प्रमुख " म्हणून बैठकीचे काम पाहिले.

या बैठकीत समितीने चौथ्या अहवालातील शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीसंबंधी नियोजन (रोहयो) व महसूल व वन (महसूल) या विभागांकडून दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ रोजी प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात सचिव, नियोजन (रोहयो) व विभागीय प्रतिनिधींची दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजीच्या अपूर्ण राहिलेली साक्ष घेतली.

**तिसरी बैठक**

**बुधवार, दिनांक १५ मे, २०१८**

समितीची बैठक बुधवार, दिनांक १५ मे, २०१८ रोजी दुपारी १-०० वाजता विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

**उपस्थिती**

**समिती प्रमुख :**

(१) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.

**समिती सदस्य :**

(२) श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.

(३) श्री. रमेश बुंदिले, वि.स.स.

(४) श्री. नारायण कुचे, वि.स.स.

(५) श्री. संजीवरेड्डी बोदकुरवार, वि.स.स.

(६) श्री. अनिल बाबर, वि.स.स.

(७) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव.

(२) श्री. बाळकृष्ण माने, अवर सचिव (समिती),

(३) श्री. मोहन काकड, कक्ष अधिकारी.

**मंत्रालयीन अधिकारी :—**

(१) श्री. एकनाथ डवले, सचिव, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

(२) श्री. प्रमोद शिंदे, उप सचिव, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

(३) श्री. बा. कि. रासकर, उप सचिव, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

(४) श्रीमती ल. घ. वरखाडे, अवर सचिव (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

**विभागीय प्रतिनिधी :—**

श्री. पुरुषोत्तम पाटोदकर, उपायुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

---

या बैठकीत समितीने चौथ्या अहवालातील (२०१५-१६) शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या अनुषगांने नियोजन (रोहयो) विभागाकडून प्राप्त झालेल्या माहिती संदर्भात सचिव, नियोजन (रोहयो) व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली (साक्ष अपूर्ण).

**चौथी बैठक**

**बुधवार, दिनांक २० जून, २०१८**

समितीची बैठक बुधवार, दिनांक २० जून, २०१८ रोजी दुपारी १-०० वाजता विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

**उपस्थिती**

**समिती प्रमुख :**

(१) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.

**समिती सदस्य :**

(२) श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.

(३) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

(४) श्री. रमेश बुंदिले, वि.स.स.

(५) श्री. अनिल बाबर, वि.स.स.

(६) श्री. भाऊसाहेब कांबळे, वि.स.स.

(७) श्री. विनायक मेटे. वि.प.स.

(८) श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव

(२) श्री. बाळकृष्ण माने, अवर सचिव (समिती),

(३) श्री. मोहन काकड, कक्ष अधिकारी.

**मंत्रालयीन अधिकारी :—**

(१) श्री. एकनाथ डवले, सचिव, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

(२) श्री. प्रमोद शिंदे, उप सचिव, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

(३) श्री. बा. कि. रासकर, उप सचिव, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

(४) श्रीमती ल. घ. वरखाडे, अवर सचिव (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

**विभागीय प्रतिनिधी :—**

(१) श्री. एस.आर. नायक, आयुक्त (मनरेगा), नागपूर.

(२) श्री. पुरुषोत्तम पाटोदकर, उपायुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

(३) डॉ. संजय कोलते, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. उस्मानाबाद.

(४) श्री. राजेंद्र खंदारे, उप जिल्हाधिकारी (रोहयो), उस्मानाबाद.

---

या बैठकीत समितीने चौथ्या अहवालातील (२०१५-१६) शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या अनुषगांने नियोजन (रोहयो) विभागाकडून प्राप्त झालेल्या माहिती संदर्भात सचिव, नियोजन (रोहयो) व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली (साक्ष अपूर्ण).

## पाचवी बैठक

### बुधवार, दिनांक २ जानेवारी, २०१९

समितीची बैठक बुधवार, दिनांक २ जानेवारी, २०१९ रोजी दुपारी १-०० वाजता विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते. :—

### उपस्थिती

**समिती प्रमुख :**

(१) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.

**समिती सदस्य :**

(२) श्री. अनिल बाबर, वि.स.स.

(३) श्री. विनायक मेटे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. बाळकृष्ण माने, अवर सचिव (समिती),

(२) श्री. मोहन काकड, कक्ष अधिकारी.

**मंत्रालयीन अधिकारी :—**

(१) श्री. एकनाथ डवले, सचिव, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

(२) श्रीमती चित्रकला सुर्यवंशी, सहसचिव, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

(३) श्री. प्रमोद शिंदे, उप सचिव, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

(४) श्रीमती ल. घ. वरखाडे, अवर सचिव, (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई.

**विभागीय प्रतिनिधी :—**

(१) श्री. पुरुषोत्तम पाटोदकर, उपायुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

(२) श्री. राजेंद्र अहिरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो), औरंगाबाद विभाग.

(३) श्री. राजेंद्र खंदारे, उप जिल्हाधिकारी (रोहयो), उस्मानाबाद.

---

या बैठकीत समितीने चौथ्या अहवालातील (२०१५-१६) शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या अनुषगांने नियोजन (रोहयो) विभागाकडून प्राप्त झालेल्या माहिती संदर्भात सचिव, नियोजन (रोहयो) व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली (साक्ष अपूर्ण).

**सहावी बैठक**

**मंगळवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१**

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी दुपारी १-०० वाजता विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) श्री. मनोहर चंद्रिकापुरे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**समिती सदस्य :**

(२) श्री. अनिल बाबर, वि.स.स.

(३) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.

(४) श्री. शिरीष चौधरी, वि.स.स.

(५) श्री. विक्रमसिंह सावंत, वि.स.स.

(६) श्री. दिलीप बोरसे, वि.स.स.

(७) श्री. राजेश पाटील, वि.स.स.

(८) श्री. राजेश राठोड, वि.प.स.

(९) श्री. गोपीचंद पडळकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव

(२) श्री. नितीन आहेर, कक्ष अधिकारी

**मंत्रालयीन अधिकारी :**

(१) श्री. नंदकुमार, अपर मुख्य सचिव, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई

(२) श्रीमती चित्रकला सुर्यवंशी, सह सचिव, नियोजन (रोहयो) विभाग, मंत्रालय, मुंबई

(३) डॉ. माधव वीर, उप सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. राजेंद्र अहिरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद.

(२) श्री. महेंद्रकुमार कांबळे, उप जिल्हाधिकारी (रोहयो), उस्मानाबाद.

(३) श्री. प्रभाकर हेडाऊ, सह आयुक्त, नरेगा, नागपूर.

(४) श्री. विवेक जोशी, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

---

या बैठकीत समितीने चौथ्या अहवालातील (२०१५-१६) शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या अनुषगांने नियोजन (रोहयो) विभागाकडून प्राप्त झालेल्या माहिती संदर्भात अपर मुख्य सचिव, नियोजन (रोहयो) व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली (साक्ष पूर्ण).

## सातवी बैठक
## सोमवार, दिनांक २१ मार्च, २०२२

समितीची बैठक सोमवार, दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी दुपारी ०२.०० वाजता विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) श्री. मनोहर चंद्रिकापुरे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**समिती सदस्य :**

(२) श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स.

(३) श्री. उदयसिंग राजपुत, वि.स.स.

(४) श्री. महेंद्र थोरवे, वि.स.स.

(५) श्री. बबनराव शिंदे, वि.स.स.

(६) श्री. सुनिल भुसारा, वि.स.स.

(७) श्री. शिरीष चौधरी, वि.स.स.

(८) श्री. विक्रमसिंह सावंत, वि.स.स.

(९) श्री. बबनराव यादव लोणीकर, वि.स.स.

(१०) श्री. दादाराव केचे, वि.स.स.

(११) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.

(१२) श्री. समीर कुणावार, वि.स.स.

(१३) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

(१४) ॲड. आकाश फुंडकर, वि.स.स.

(१५) श्री. दिलीप बोरसे, वि.स.स.

(१६) श्री. राजेश पाटील, वि.स.स.

(१७) श्री. नरेंद्र दराडे, वि.प.स.

(१८) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.

(१९) श्री. रामदास आंबटकर, वि.प.स.

(२०) श्री. गोपीचंद पडळकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव,

(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव,

(३) श्री. रविंद्र जगदाळे, अवर सचिव,

(४) श्री. नितीन आहेर, कक्ष अधिकारी

या बैठकीत समितीने आपल्या पहिल्या अनुपालन अहवालाच्या प्रारुपावर विचार केला व तो आवश्यक त्या सुधारणासह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई